


# विदर्भ प्रजासत्ताक




https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -२८९ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शनिवार दि. १४ डिसेंबर २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## श्रीकांत शिंदे आणि राहुल गांधी यांच्यात संसदेत तुफान खडाजंगी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १४ नवी दिल्ली**

संविधानाच्या ७५ वर्षांच्या गौरवशाली प्रवासानिमित्त सलग दोन दिवस संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये संविधानावर चर्चा चालू आहे. आज याच मुद्‌्यावर बोलताना डॉ.श्रीकांत शिंदे आणि राहुल गांधी यांच्यात तुफान खडाजंगी झाली. श्रीकांत शिंदेंनी आज संविधानावर सुरू केलेली चर्चा थेट महाराष्ट्रातील विरोधी पक्षनेत्यापर्यंत आणली. यावर मध्येच उठत राहुल गांधींनीही त्यांना रोखलं. पण श्रीकांत शिंदेंनी त्यांचं भाषण सुरूच ठेवले.

श्रीकांत शिंदे म्हणाले, आज ऐतिहासिक दिवस आहे. संविधान हे समाजाचं आणि संसदेचं स्त्रोत आहे. राहुल गांधींनी आज संविधानाला सोडून त्यांनी अनेक विषयांवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला. मागच्या वेळी राहुल गांधी अभय मुद्राची गोष्ट करत होते. आताही ते त्याच्याबाहेर आले नाहीत. अभय मुद्रा अहिंसा शिकवतात. पण हे १९८४ मध्ये नॉन स्टॉप हिंसाचार करण्याचं काम यांनी केलं, असं म्हणत काँग्रेसच्या कार्यकाळात झालेल्या अहिंसात्मक घटनांविषयी श्रीकांत शिंदेंनी माहिती दिली.



**संविधानामुळे सामान्य रिक्षाचालक महाराष्ट्राचा मुख्यमंत्री बनला**

ते पुढे म्हणाले, राहुल गांधी सावरकरांचा अपमान करतात. हा अपमान उबाठा वाल्यांना मान्य आहे का? मी तुम्हाला तुमची आजीचं एक वाक्य सांगू इच्छितो. स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारकचे सचिव पंडित बाखले यांनी इंदिरा गांधींना पत्र लिहिलं होतं. या पत्राचं उत्तर देताना इंदिरा गांधींनी सावरकरांचं कौतुक केलं होतं. हे पत्रच आज श्रीकांत शिंदेंनी सभागृहात वाचून दाखवलं. ते पुढे म्हणाले,मी विचारू इच्छितो की तुमची आजीही संविधानविरोधी आहे का? याच संविधानामुळे आम्ही इथे बसलो आहोत. हे श्रेय संविधनाचं आहे. याच संविधानाने साधारण परिवारातून येणाऱ्या नरेंद्र मोदींना पंतप्रधान बनवले. तसंच, सामान्य रिक्षाचालकाला महाराष्ट्राचे मुख्यमंत्री बनवले. तसंच, त्यांचं भाषण सुरू असताना श्रीकांत शिंदेंनी विरोधकांना दरडावलं. महाराष्ट्रात महाविकास आघाडीला विरोधी पक्षनेताही बनवता येऊ शत नाहीय, असंही ते म्हणाले.

तेवढ्यात राहुल गांधी उठले आणि म्हणाले, त्यांनी माझं नाव घेतलंय. मला त्यांना उत्तर द्यायचंय. ते असं म्हणताच सभागृहात गोंधळ सुरू झाला. श्रीकांत शिंदेंनी त्यांचं म्हणणं पूर्ण करण्याची परवानगी मागितली. दरम्यान, विरोधकांनी सभागृहात बराच गोंधळ घातला. मोठ्या आवाजात घोषणाबाजी झाली. या घोषणाबाजीतच श्रीकांत शिंदेंनी त्यांचं भाषण सुरू ठेवलं.

दरम्यान, श्रीकांत शिंदेंच्या भाषणादरम्यान विरोधकांनी जागेवरून उठत सभागृहात गोंधळ घातला. राहुल गांधींना बोलायची संधी द्यावी, अशी मागणी विरोधकांकडून जोर धरू लागली. अखेर संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनीही यात हस्तक्षेप केला. परंतु, विरोधक आपल्या मागणीवर अडून राहिले. अखेर, पिठासीन अधिकारी कृष्णा प्रसाद तेन्नेटी यांनी मध्यस्ती करत राहुल गांधींना यांना बोलायची संधी दिली.

**अखेर राहुल गांधींनी दिलं प्रत्युत्तर**

राहुल गांधींनी तत्काळ उभं राहत श्रीकांत शिंदेंच्या प्रश्नाला उत्तर दिलं. राहुल गांधी म्हणाले, श्रीकांत शिंदेंनी मला विचारलं की इंदिरा गांधींचं सावरकरांबाबत काय भूमिका होती? मी लहान असताना इंदिरा गांधींना याबाबत विचारलं होतं. त्या म्हणाल्या होत्या, सावरकरांनी ब्रिटिशांशी तडजोड केली होती. गांधीजी जेलमध्ये गेले, नेहरू जेलमध्ये गेले आणि सावरकरांनी माफी मागितली होती.

दरम्यान, या उत्तरावरही समाधान न झाल्याने श्रीकांत शिंदेंनी पुन्हा इंदिरा गांधींच्या त्या पत्राचा दाखला देत सावरकरांविषयीची भूमिका स्पष्ट करायला सांगितली.

## ...तोपर्यंत शिंदेंना मंत्रिमंडळात घेऊच नका आदित्य ठाकरेंची फडणवीसांकडे मोठी मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १४ मुंबई**

आज शिवसेना ठाकरे गटाचे नेते आमदार आदित्य ठाकरे यांची पत्रकार परिषद पार पडली. या पत्रकार परिषदेमध्ये बोलताना त्यांनी पुन्हा एकदा भाजप आणि एकनाथ शिंदे यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे. मुंबईतील रस्ता घोटाळ्याची एसआयटी चौकशी लावा अशी मागणी मुंबई भाजपाकडून होत आहे, यावर प्रतिक्रिया देताना त्यांनी भाजपला जोरदार टोला लगावला आहे.



मुंबई भाजपकडून मुंबई रस्ता घोटाळाप्रकरणात एसआयटी चौकशी लावण्याची मागणी होत आहे. यावर प्रतिक्रिया देताना आदित्य ठाकरे यांनी जोरदार हल्लाबोल केला आहे. मुंबईतील रस्त्याच्या घोटाळ्याची चौकशी करा हेच मी बोलत होतो. जी मी मागणी करत होतो, तीच मागणी आता भाजप करत आहे. खोके सरकारच्या देखरेखीत मोठा घोटाळा झाला आहे. आता फडणवीसांचं सरकार आलं आहे, त्यांना आता स्वच्छ सरकार चालवण्याची खरोखर मोठी संधी आहे, त्यांना जर स्वच्छ सरकार चालवायचं असेल तर त्यांनी चौकशी पूर्ण होईलपर्यंत एकनाथ शिंदे, दीपक केसरकर आणि मंगलप्रभात लोढा यांना मंत्रिमंडळात घेऊ नये, अशी मागणी यावेळी आदित्य ठाकरे यांनी केली आहे.

## शस्त्रक्रियेनंतर ४३ महिलांना थंडीच्या कडाक्यात झोपवले जमिनीवर

### धक्कादायक प्रकारानंतर यंत्रणा खडबडून जागी, संतोष बांगर यांच्या भूमिकेने आश्चर्य

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १४ हिंगोली**

हिंगोलीतील आरोग्य यंत्रणेचा गलथान कारभार पुन्हा एकदा समोर आला आहे. भर थंडीत शस्त्रक्रियेनंतर ४३ महिलांना जमिनीवर झोपवल्या गेले. १३ डिसेंबर रोजी कुटुंब कल्याण योजना शिबिरात महिलांना थंडीच्या काळात थेट जमिनीवर झोपावे लागले. थंडगार फरशीवर महिलांना झोपण्याची व्यवस्था केल्याचा व्हिडिओ समोर आला. शस्त्रक्रियेनंतर झोपण्यासाठी रुग्णालयात कॉट उपलब्ध नसल्याने महिलांना जमिनीवर झोपण्याची वेळ आली. कळमनुरी तालुक्यातील बाळापूर ग्रामीण रुग्णालयात हा प्रकार घडला. याविषयीचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर आरोग्य यंत्रणा खडबडून जागी झाली. चूक



दुरूस्त करण्याचा प्रयत्न करण्यात आला. पण या घटनेवर आमदार संतोष बांगर यांच्या भूमिकेने सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला.

काल शुक्रवारी ग्रामीण भागातील महिलांवर कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करण्यात आली. पण बेड नसल्याने यातील ४३ महिलांना थेट फरशीवर झोपवण्यात आले. ऐन थंडीच्या कडाक्यात महिलांना फरशीवर झोपावे लागले. आरोग्य यंत्रणेचा गलथान कारभार समोर आला. या सर्व घटनेनंतर नागरिकांनी आरोग्य खात्यावर रोष व्यक्त केला. शस्त्रक्रियेनंतर स्वच्छेतेबाबतही काळजी न घेतल्याने नाराजीचा सूर वाढला. पण यंत्रणा हालली नाही. पण जेव्हा याविषयीचे वृत्त प्रसिद्ध झाले. त्यावेळी यंत्रणा खडबडून जागी झाली. या हलगर्जीपणाबाबत रुग्णालयावर आणि अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी आता करण्यात येत आहे.

**नातेवाईकांना अश्रू अनावर**

कळमनुरी तालुक्यातील आखाडा बाळापूर ग्रामीण रुग्णालयात शस्त्रक्रिया झाल्यानंतर तब्बल ४३ महिलांना जमिनीवरती झोपवण्यात आले. आता महिलांना डिस्चार्ज करण्यात आलं आहे. महिलांच्या नातेवाईकांच्या प्रतिक्रिया जाणून घेतल्या असत्या. नातेवाईकांना त्यांचे अश्रू लपवता आले नाही. पण यंत्रणेला सुरुवातीला कोणताही पाझर फुटला नाही. वृत्त समोर आल्यानंतर यंत्रणा जागी झाली.

**यंत्रणा खडबडून जागी, चुक सुधारली**

बाळापुर घटनेनंतर आरोग्य विभाग खड़बडून जागा झाला. जिल्हा शल्यचिकित्सकांसह जिल्ह्याच पथक बाळापूर ग्रामीण रुग्णालयात दाखल घडलेल्या घटनेनंतर अधिकचे २० बेड वाढवणार असल्याची माहिती जिल्हा शल्यचिकित्सक नितिन तडस यांनी दिली आहे.

**संजय बांगर यांची प्रतिक्रिया काय?**

आखाडा बाळापूर येथे घडलेला प्रकार धक्कादायक नाही. त्यात आरोग्य विभागाने कोणताही हलगर्जीपणा केला नाही, अशी प्रतिक्रिया आमदार संतोष बांगर यांनी दिली. येथील आरोग्य केंद्राला, रुग्णालया आपण अनेकदा भेट दिली. महिलांची संख्या जास्त होती आणि वेळ कमी असल्याने जमिनीवर गाद्या टाकून महिलांची सोय करण्यात आल्याची भूमिका त्यांनी घेतली.

## जालनात एसटी बस आणि भरधाव टेम्पो ट्रकची धड़क, २ जणांचा मृत्यू तर अनेक प्रवासी जखमी


**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १४ जालना**

प्रवाशांनी खचाखच भरलेली एसटी बस आणि भरधाव टेम्पो ट्रकची धडक झाल्याने भीषण अपघात होऊन जालन्याच्या नाव्हा शिवारामध्ये दोन ते तीन जणांचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना उघडकीस आली आहे. घटनेतील ट्रेम्पो ट्रक चालक मद्य पिऊन वाहन चालवित असल्याची प्राथमिक माहिती उघडकीस आली आहे. छत्रपती संभाजीनगरहून ही बस माहुरगडकडे येताना टेम्पोने पुढील एसटीच्या पुढच्या बाजूस धडक दिल्याने एसटी महामंडळाच्या बसचा समोरील भागाचा अक्षरशः चेंदामेदा झाला आहे.



एसटी महामंडळाच्या एका बसचा जालना येथील नाव्हा शिवारामध्ये येथे टेम्पोने धडक दिल्याने भीषण अपघात झाल्याची घटना शनिवारी घडली आहे. ही ट्रकची धडक इतकी भीषण होती की एसटी महामंडळाच्या बसचा पुढील भागाचा चेंदामेंदा झाला आहे. या अपघातात दोन - तीन प्रवाशांचा जागीच मृत्यू झाल्याचे म्हटले जात आहे. ही एसटी बस जालन्याकडून मेहकरच्या दिशेने जात होती. त्यावेळी मेहकरच्या दिशेने येणाऱ्या टेम्पो ट्रकने बसला जोरदार धडक दिली. त्यामुळे बसच्या पुढी भागात बसलेल्या दोन ते तीन प्रवाशांचा जागीच मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती आहे. पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून जखमींना रुग्णालयात हलवण्यासाठी पोलिसांकडून मदत कार्य सुरू आहे.

## लालकृष्ण अडवाणी यांची प्रकृती बिघडली; दिल्लीच्या अपोलो हॉस्पिटलमध्ये केले दाखल



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १४ नवी दिल्ली**

भाजपाचे ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी यांची तब्येत बिघडल्यामुळे त्यांना दिल्लीच्या अपोलो हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे. सध्या त्यांची प्रकृती स्थिर असून काही वेळाने मेडिकल बुलेटिन जारी केले जाईल अशी माहिती डॉक्टरांनी दिली. लालकृष्ण अडवाणी यांचे वय ९६ वर्ष आहे. मागील ४-५ महिन्यापासून अनेकदा त्यांना रुग्णालयात दाखल करावे लागले होते. ऑगस्ट २०२४ मध्येही अडवाणी यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले होते.

माहितीनुसार, लालकृष्ण अडवाणी गेल्या काही काळापासून आरोग्याशी निगडीत समस्यांमुळे त्रस्त आहेत. याचवर्षी देशातील सर्वोच्च सन्मान भारतरत्न पुरस्काराने त्यांना गौरवण्यात आले होते. लालकृष्ण अडवाणींना प्रकृती कारणास्तव राष्ट्रपती भवनातील कार्यक्रमाला उपस्थित राहता आले नाही त्यामुळे त्यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांना पुरस्कार देण्यात आला होता. ८ नोव्हेंबरला पंतप्रधान नरेंद्र मोदींनी लालकृष्ण अडवाणी यांच्या वाढदिवशी त्यांच्या निवासस्थानी जाऊन शुभेच्छा दिल्या होत्या.

लालकृष्ण अडवाणी हे भारतीय राजकारणातील प्रमुख व्यक्तीपैकी एक आहेत. लालकृष्ण अडवाणी हे गेल्या १० वर्षांपासून सतेत असलेल्या भाजपाच्या संस्थापक सदस्यांपैकी ते एक आहेत. लालकृष्ण अडवाणी हे दृढनिश्चयी आणि सक्षम नेते म्हणून ओळखले जातात. त्यांनी आपल्या प्रदीर्घ राजकीय कारकिर्दीत अनेक महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सांभाळल्या आहेत. अडवाणींचा जन्म ८ नोव्हेंबर १९२७ साली कराची येथे झाला होता. १९४२ साली ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी जोडले गेले.

१९८६ ते १९९० पर्यंत आणि १९९३ ते १९९८ आणि २००४-०५ या कालावधीत लालकृष्ण अडवाणी यांनी भाजपाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाची धुरा सांभाळली होती. पक्षाचे दीर्घ काळ अध्यक्षपद सांभाळणारे नेते अशी लालकृष्ण अडवाणी यांची ओळख आहे. त्याशिवाय अटलबिहारी वाजपेयी यांच्या सरकारच्या काळात ते गृहमंत्री आणि देशाचे उपपंतप्रधान म्हणून जबाबदारी सांभाळली आहे.

## इस्रो सर्वात मोठ्या प्रयोगाच्या तयारीत, 'या' दिवशी मिशन लाँच करण्याची शक्यता

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १४ बंगळुरु**

इस्रो या महिन्याच्या अखेरीस आपला सर्वात मोठा प्रयोग करणार आहे. ३० डिसेंबर रोजी स्पेडेक्स लाँच होण्याची शक्यता असून PSLV-C60 रॉकेटने हे प्रक्षेपण करता येते. हे भारतीय स्पेस स्टेशन कसे बांधले जाईल आणि चांद्रयान-४ कसे जाईल हे ठरवेल त्यामुळे इस्रोच्या भविष्यातील सर्व मोहिमा या एकाच प्रक्षेपणावर अवलंबून आहेत.

या प्रयोगाचे यश BAS म्हणजे भारतीय अंतराळ स्थानकाचे बांधकाम आणि चांद्रयान-४ मोहिमेचे यश याच्यावर अवलंबून आहे. श्रीहरिकोटा येथील सतीश



धवन स्पेस सेंटरच्या पहिल्या प्रक्षेपण पॅडवरून भारतीय अंतराळ संस्था ३० डिसेंबर २०२४ रोजी स्पेडेक्स मिशन लाँच करू शकते. यासाठी PSLV-C60 रॉकेटची मगत घेतली जाऊ शकतो. गगनयान-जी१ मिशनच्या प्रक्षेपणासाठी दुसरे लॉन्चपॅड तयार केले जात आहे.

त्याची तयारीही पुढील आठवड्यापासून सुरू होणार आहे. स्पेसेक्स मिशनमध्ये दोन भिन्न अंतराळयान अंतराळात जोडलेले दाखवले जातील. हा प्रयोग पृथ्वीच्या खालच्या कक्षेत केला जाईल आणि हे दोन्ही भाग पृथ्वीच्या खालच्या कक्षेला जोडले जातील. ज्यामुळे ते पुन्हा एक युनिट बनतील. दोन्ही वेगवेगळे भाग एकमेकांना स्वतःहून अवकाशात शोधतील जेणेकरून ते एकाच कक्षेत येऊ शकतील. यानंतर दोघेही एकमेकांना जोडतील. इस्रो आपल्या सर्वात मोठ्या प्रयोगाच्या तयारीत आहे. त्यामुळे हे मिशन अत्यंत महत्त्वाचे आहे

## महायुतीत मलईदार खात्यांसाठी भांडणं, मंत्रिमंडळ विस्तारावरून नाना पटोलेंचा सरकारवर हल्लाबोल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १४ मुंबई**

विधानसभेच्या निकालानंतर राज्यात महायुतीचं सरकार स्थापन झालं असलं तरी अद्याप मंत्रिमंडळाचा विस्तार झालेला नाही. आता १५ डिसेंबर रोजी मंत्रिमंडळाचा विस्तार होणार असल्याची चर्चा आहे. मात्र, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांना मंत्रिमंडळाचा विस्तार करण्यासाठी एवढा वेळ का लागत आहे? यावरून आता विरोधक अनेक सवाल उपस्थित करत आहेत. दरम्यान, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनीही महायुती सरकारवर मंत्रिमंडळाच्या विस्तारावरून



खोचक टीका केली आहे. महायुतीत मलईदार खात्यांसाठी भांडणं सुरु आहेत. मलईचं खातं कोणाला मिळेल? फक्त यासाठी सरकार काम करत असल्याचा हल्लाबोल नाना पटोले यांनी केला. तसेच परभणीत घडलेल्या संविधानाच्या प्रतिकृतीच्या अवमानाच्या घटनेवरूनही त्यांनी राज्य सरकारवर टीका केली.

**नाना पटोले काय म्हणाले?**

परभणीत संविधानाच्या प्रतिकृतीचा अवमान झाल्याच्या घटनेबाबत बोलताना नाना पटोले म्हणाले, परभणीतील घटनेचा आम्ही निषेध करतो. संविधान प्रतिकृती विटंबनेच्या घटनेप्रकरणी आम्ही सरकारकडे कारवाईची मागणी केली. मात्र, आज राज्यात तीन जणांचे जे सरकार आहे, सरकारमध्ये मलाईच्या खात्यासाठी भांडणं सुरु आहेत. मलाईचे खाते कोणाला मिळतात? फक्त यासाठी सरकार काम करत आहे. मग या सरकारने प्रशासनाला जे काही आदेश दिले त्या आदेशाच्या जोरावर परभणीत लाठीचार्ज झाला. मग परभणीच्या जिल्हाधिकाऱ्यांना आणि पोलीस अधीक्षकांना लाठीचार्ज करण्याचे आदेश कुणी दिले होते? त्यामुळे यावर देखील कारवाई झाली पाहिजे, असं नाना पटोले म्हणाले.

## संपादकीय ......

# जागतिक सेमीकंडक्टरच्या स्पर्धेत भारत

सेमीकंडक्टरची आयात ही भारतातील व्यापारात असंतुलनाला हातभार लावत आहे आणि यात २०२२-२३ या काळात ९२ टक्के वाढ झाली. 'आयएसएम'चे (भारत सेमीकंडक्टर मिशन) ध्येय आयातीवरचे अवलंबित्व कमी करणे आणि या उद्योगात आत्मनिर्भर होण्याचे आहे. अमेरिका-चीनच्या तंत्रज्ञान युद्धात भारतात या उद्योगाची उभारणी करणे धोरणकर्त्यांना गरजेचे वाटत आहे.

'मेड इन चायना' असलेल्या सेमीकंडक्टरशी संबंधित सुटे भाग आणि तंत्रज्ञानावर अमेरिकेने निर्बंध घातल्याने जगात खळबळ उडाली आहे. ट्रम्प यांच्या विजयानंतर व्यापार युद्धात प्रत्युत्तर देण्याचा आणि सूडभावनेचा काळ सुरू झाल्याचे बोलले जात आहे. आयात शुल्क आकारण्याकडे एकप्रकारे बदला घेण्याचे धोरण म्हणून पाहिले जात असल्याने त्याचा जागतिक पुरवठा साखळीवर परिणाम झाला आहे आणि परिणामी भू-राजकारण अधिक गुंतागुंतीचे झाले आहे. विशेष म्हणजे बायडेन प्रशासनाने २०२२-२४ या काळात चिप निर्मिती आणि पुरवठा साखळीत वर्चस्व राहण्यासाठी कायदेशीर पावले उचलली होती. अमेरिकेने सेमीकंडक्टरचा शोध लावला आणि आता तो केवळ जगातील पुरवठ्याच्या केवळ १० टक्केच उत्पादन करतो. अमेरिकी वाणिज्य मंत्रालयाने लागू केलेल्या निर्बंधांचा उद्देश निर्यात कमी करणे, उच्च प्रतीचे कॉम्प्युटिंग चिप, सुपर कॉम्प्युटर आणि उच्च प्रतीचे सेमीकंडक्टरची चीनमध्ये होणार्या निर्मितीला चाप बसविण्याचा होता. अमेरिकी निर्बंधाला उत्तर देण्यासाठी चीननेही दोन निर्णय घेतले. चीनने अमेरिकेच्या सेमीकंडक्टरच्या उत्पादनासाठी आवश्यक जर्मेनियम आणि गॅलियमच्या निर्यातीवर बंदी घातली. शिवाय चीनने त्याची तक्रार जागतिक व्यापार संघटनेकडेही केली आहे. तत्पूर्वी चीनने उभय देशांतील ऐतिहासिक कराराचा दाखला देत जपानला दुर्मीळ धातूची निर्यात न करण्याचा निर्णय घेतला. याशिवाय चीनने देशांतर्गत आयटी उद्योगाला १५० अब्ज डॉलरपेक्षा अधिक अंशदान देण्यास सुरुवात केली आहे. अन्य देशही अंशदानाचा मार्ग अवलंबत आहेत. युरोप, जपान आणि भारतानेही सेमीकंडक्टरवर सबसिडी सुरू केली आहे. भविष्यात सेमीकंडक्टरचे उत्पादन अन्य ठिकाणी होत असेल, तर सहायक भागांचे उत्पादन आणि पुरवठादेखील वाढणार आहे.

महाशक्तींत तंत्रज्ञानावरून सुरू असणारी चढाओढ ही भारतीय सेमीकंडक्टर उद्योगाला भरारी घेण्यासाठी नामी संधी आहे. यापूर्वीच चीनला वैतागून मायक्रोन कंपनी आता गुजरातमध्ये ८.३ कोटी डॉलरपेक्षा अधिक गुंतवणुकीसह चाचणी आणि पॅकेजिंग केंद्र स्थापन करणार आहे. तैवानच्या टीएसएमसी आणि फॉक्सकॉन कंपन्या या भारतातील सेमीकंडक्टर उद्योगात सहभागी होण्यासाठी सकारात्मक चर्चा करत आहेत. अमेरिका-चीनचे सेमीकंडक्टर युद्ध हे भारतासाठी संधी ठरत आहे. परिणामी, नियोजनबद्धरीत्या जागतिक उद्योगांचे स्थानांतर होईल. शिवाय भारताची क्षमता वाढेल आणि पुरवठा साखळीची पुनर्रचना होईल. भारताच्या धोरणकर्त्यांच्या मते, सक्षम सेमीकंडक्टर उद्योगाशिवाय भारत चौथ्या औद्योगिक क्रांतीत महत्त्वाचा खेळाडू ठरू शकणार नाही. २०२१ मध्ये मोदी प्रशासनाने भारतात सेमीकंडक्टर उद्योगाच्या पायाभरणीसाठी आणि निर्मितीसाठी जागतिक सेमीकंडक्टर मूल्य साखळीत जोडण्याचे ध्येय समोर ठेवले आणि भारत सेमीकंडक्टर मिशन लाँच केले. भारताच्या आर्थिक धोरणासमोरील काही महत्त्वाच्या आव्हानांपैकी एक म्हणजे चीनशी असणारे व्यापारी असंतुलन.

सेमीकंडक्टरची आयात ही भारतातील व्यापारात असंतुलनाला हातभार लावत आहे आणि यात २०२१-२३ या काळात ९२ टक्के वाढ झाली. 'आयएसएम'चे (भारत सेमीकंडक्टर मिशन) ध्येय आयातीवरचे अवलंबित्व कमी करणे आणि या उद्योगात आत्मनिर्भर होण्याचे आहे. अमेरिका-चीनच्या तंत्रज्ञान युद्धात भारतात या उद्योगाची उभारणी करणे धोरणकर्त्यांना गरजेचे वाटत आहे. त्यांच्या मते, सध्याचा भू-राजकीय आणि भू-आर्थिक ट्रेंड हा नवी दिल्लीच्या बाजूने आहे, कारण अमेरिका आणि त्याचा प्रमुख सहकारी जसे जपान हे चीनला सेमीकंडक्टर हब होऊ नये यासाठी आटापिटा करत आहेत. त्यांच्या धोरणांनुसार समान विचारांच्या देशांच्या आधारावर पुरवठा साखळी तयार करणे आणि भारतीय धोरणकर्ते हे सेमीकंडक्टर उद्योगावर प्रभाव पाडणार्या उदारमतवादी देशांना सोबत घेण्यास इच्छुक आहेत. अशा देशांना नैसर्गिक भागीदार करू इच्छित आहेत.

सेमीकॉन इंडिया २०२३ परिषदेदरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी समान विचारसरणी असलेल्या लोकशाही देशांत विश्वसनीय साखळी तयार करण्यात भारताचे असणारे महत्त्व अधोरेखित केले होते. भारत चिप निर्मिती उद्योगाला चालना देण्यासाठी समविचारी देशांसमवेत भागीदारी आणि सहकार्य वाढविण्याचा प्रयत्न करत आहे. भारताने अमेरिका, जपान, तैवानसह चिप निर्मिती सहकार्य मजबूत केले आहे. भारताने जानेवारी २०२३ मध्ये 'क्रिटिकल अँड इमर्जिंग टेक्नॉलॉजी'च्या माध्यमातून अमेरिकेसह एक धोरणात्मक सहकार्य प्रस्थापित केले. अर्थात, त्याचे ध्येय लवचीक सेमीकंडक्टर पुरवठा साखळी मजबूत करण्याचे होते. शिवाय भारत सरकारने पूरक सेमीकंडक्टर परिस्थितीजन्य प्रणालीसाठी तातडीचे आणि दीर्घकाळातील संधीचा शोध घेण्यासाठी एक कृती दल तयार केले आहे. भारत इलेक्ट्रॉनिक्स सेमीकंडक्टर असोसिएशन आणि यूएस सेमीकंडक्टर इंडस्ट्री असोसिएशन यांच्यात संस्थात्मक सहकार्यदेखील निश्चित केले आहे.

# राज्यातील २५० जिम्नास्टीक पटू सादर करणार क्रीडा कौशल्य

## श्री हव्याप्र मंडळ येथे दोन दिवसीय राज्य अजिंक्य जिम्नॅस्टिक स्पर्धा आजपासून

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४ अमरावती-** जागतिकस्तरावर लौकीक असलेल्या जिम्नास्टीक खेळांमध्ये श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या जिम्नास्टीक पटूंनी एक स्वतंत्र अशी ओळख राष्ट्रीयस्तरावर निर्माण केली आहे. राज्यासह जिल्ह्यातील जिम्नास्टिक खेळाडूंना राष्ट्रीयस्तरावर एक सक्षम व्यासपीठ मिळाले याकरीता दरवर्षी प्रमाणे यंदाही मंडळाच्या अनंत क्रीडा मंदीर येथे १९ वी ट्रॅम्पोलिन व टम्बलिंग जिम्नास्टीक राज्य अजिंक्य स्पर्धा २०२४-२५ चे दोन दिवसीय आयोजन दि.१४,१५ डिसेंबर २०२४ दरम्यान करण्यात येत आहे.श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ, महाराष्ट्र हौशी जिम्नास्टीक संघटना, अमरावती जिल्हा हौशी जिम्नास्टीक संघटना, मंडळाचे डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार दि.१४ डिसें. २०२४ रोजी सकाळी १० वा. मंडळाच्या जिम्नास्टीक विभाग, अनंत क्रीडा सभागृह येथे उद्घाटन पार पडणार आहे. मंडळाचे सचिव पद्मश्री प्रभाकरराव वैद्य यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजीत या उद्घाटन सोहळ्याला अध्यक्ष म्हणुन अमरावती जिल्हा हौशी जिम्नॅस्टिक संघटनेचे अध्यक्ष व श्री हव्याप्र मंडळाचे सचिव प्रा. रवींद्र खांडेकर उपस्थित राहणार आहेत. प्रमुख अतिथी मध्ये मंडळाच्या सचिव प्रा. डॉ. माधुरीताई चेंडके, मनपा उपायुक्त नरेंद्र वानखडे महाराष्ट्र राज्य हौशी संघटनेचे तांत्रिक समिती अध्यक्ष, स्पर्धा संचालक पवन भोईर, संघटनेचे सचिव मकरंद जोशी, कोषाध्यक्ष आशिष सावंत मंडळाचे उपाध्यक्ष डॉ. श्रीकांतराव चेंडके, कार्याध्यक्ष ॲड. प्रशांत देशपांडे, कोषाध्यक्ष प्राचार्य डॉ. श्रीनिवास देशपांडे, सचिव प्रा. डॉ. विकास कोळेश्वर, प्रा. राजेश पांडे, राज्य क्रीडा मार्गदर्शक योगेश शिरके मान्यवर उपस्थित राहणार आहेत.



जिम्नॅस्टिक विभाग प्रमुख प्रा. आशिष हाटेकर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या दोन दिवसीय राज्य अजिंक्य जिम्नास्टीक स्पर्धेमध्ये राज्यातील २५० पेक्षा अधिक खेळाडूंनी सहभाग घेतला आहे. शिवाय ५० पंच, संघ व्यवस्थापक स्पर्धेची जबाबदारी सांभाळणार आहेत. स्पर्धेच्या यशस्वितेकरिता जिम्नॅस्टिक विभागाची चमू अथक परिश्रम घेत आहे.

# मुबलक पाण्यामुळे राज्यात 'इतके' लाख हेक्टरने वाढले रब्बीचे क्षेत्र

मागील वर्षीच्या तुलनेत यंदा राज्यात चांगला पाऊस झाला. त्यामुळे यंदा रब्बीचे क्षेत्रात वाढ झाली आहे. पिकनिहाय आतापर्यंत किती पेरणी झाली ते वाचा सविस्तर (ठरलळ िशरीपी २०२४)

मागील वर्षीच्या तुलनेत यंदा राज्यात चांगला पाऊस झाला. त्यामुळे यंदा रब्बीचे क्षेत्र ९ लाख १६ हजार २७१ हेक्टरने वाढले आहे. राज्यात ३७ लाख १९ हजार ५६७ हेक्टर क्षेत्रावर रब्बीची पेरणी झाली होती.

यंदा मात्र, १२ डिसेंबरपर्यंतच राज्यात ४८ लाख ९१ हजार ६०४ हेक्टर क्षेत्रावर रब्बीची पेरणी झाली आहे. अद्यापही राज्यात अनेक ठिकाणी रब्बीची पेरणी सुरू असल्याने यंदा या क्षेत्रात मोठी वाढ होण्याची शक्यता आहे.

राज्यात रब्बी पिकाखालील सरासरी क्षेत्र ५३ लाख ९६ हजार ९६९ हेक्टर आहे. यंदा मान्सून चांगला झाल्याने रब्बी पिकांखालील क्षेत्रात किमान १० टक्क्यांपेक्षा जास्त वाढ होईल, असा अंदाज कृषी विभागाने वर्तविला आहे.

कृषी विभागाच्या अहवालानुसार राज्यात १२ डिसेंबरपर्यंत ४८ लाख ९१ हजार ६०४ हेक्टर अर्थात सरासरी क्षेत्राच्या ८५.९० टक्के क्षेत्रावर पेरण्या झाल्या आहेत. मागील वर्षीच्या तुलनेत मात्र यंदा अधिक पेरणी झाली आहे.




राज्यात ३७ लाख १९ हजार ५६७ हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली होती. अर्थात मागील वर्षीच्या तुलनेत यंदा रब्बीचे क्षेत्र २४ टक्क्यांनी वाढले आहे. अद्याप रब्बी पेरणीसाठी वेळ हाती असून, अनेक ठिकाणी पेरणीला वेग आला आहे. त्यामुळे आता या क्षेत्रात मोठी वाढ होण्याची शक्यता आहे.


**पिकनिहाय अशी झाली पेरणी-** रब्बी ज्वारी १३,४६,१३८, गहू ८,१८,२६७, मका ३,४३,५४५, इतर रब्बी तृणधान्ये ५,७७२ यात (बाजरी, ओट, बार्ली, इतर), हरभरा २२,३२,८४७, इतर कडधान्ये १,०६,६१९,करडई २७,८६०, जवस ४,२९२, तीळ ८६०, सुर्यफुल १,५३०, रब्बी तेलबिया ८,८७४ हेक्टर क्षेत्रामध्ये अशी पेरणी आतापर्यंत करण्यात आली आहे.

**सर्वाधिक पेरणी लातूर विभागात** यंदाच्या रब्बी हंगामात सर्वाधिक पेरणी लातूर विभागात झाली आहे. या विभागात सरासरी १३ लाख ६३ हजार ९३० हेक्टर क्षेत्रावर रब्बीची पेरणी अपेक्षित असताना ९ डिसेंबरपर्यंतच १३ लाख ८० हजार ९०९ हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली आहे. हे प्रमाण सरासरीच्या १०१. २४ टक्के आहे. मागील वर्षीच्या तुलनेत मात्र यंदा या विभागात रब्बीची पेरणी २०.९८ टक्क्यांनी वाढली आहे. गेल्यावर्षी लातूर विभागात ११ लाख २१ हजार ४२१ हेक्टरवरच रब्बी पेरणी झाली होती.

# शेतकऱ्यांना मिळणार स्वत:चा ओळख क्रमांक

***विदर्भ प्रजासत्ताक***

***दि.१४ अमरावती-*** भारत सरकारची 'ग्रीस्टॅक' संकल्पना राज्यात राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या संकल्पनेनुसार शेतकऱ्यासाठी तीन पायाभूत माहिती संच तयार करण्यात येणार आहेत.भारत सरकारची 'ग्रीस्टॅक' संकल्पना राज्यात राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या संकल्पनेनुसार शेतकऱ्यासाठी तीन पायाभूत माहिती संच तयार करण्यात येणार आहेत. यासाठी शेतकऱ्यांना स्वत:चा ओळख क्रमांक मिळणार आहे. सद्यः




स्थितीत भारत सरकारच्या मदतीने महाराष्ट्र राज्याचा शेतकरी माहिती संच तयार करण्यासाठी स्वयं नोंदणी संकेतस्थळ तयार करण्यात आले आहे. या संकेत स्थळाद्वारे शेतकऱ्यांना स्वत:चा शेतकरी ओळख क्रमांक निर्माण करता येईल व शेतकरी माहिती संचात समाविष्ट करता येणार आहे. शेतकरी माहिती संच तयार करण्यासाठी www .mhfr. agr istac k.gov.in या संकेत स्थळा चा वापर करता येणार आहे. या संकेतस्थळावर कशा प्रकारे माहिती सादर करावयाची याबाब तचे सादरीकरण १६ डिसेंबरपासून राबविण्यात येणाऱ्या मोहिमेत दिले जाणार आहे.




## अचानक वजन कमी होत असेल तर सावध व्हा! काय आहेत स्वादुपिंडाच्या कॅन्सरची लक्षणं, तज्ज्ञांनी दिली माहिती

***दि.१४ विदर्भ प्रजासत्ताक***

स्वादुपिंडात घातक पेशी तयार तेव्हा स्वादुपिंडाच्या कॅन्सरचं निदान करता येतं. हे एक्सोक्राइन किंवा एंडोक्राइन ग्रंथींच्या कार्यासह स्वादुपिंडाच्या कार्यावर परिणाम करतं. स्वादुपिंडाचा कॅन्सर हा स्वादुपिंडाच्या कोणत्याही भागात होऊ शकतो, परंतु बहुतेक स्वादुपिंडाचा कर्करोग स्वादुपिंडाच्या वरच्या भागात आढळून येतो. नवी मुंबईतील मेडिकवर रूग्णालयातील यकृत प्रत्यारोपण आणि एचपीबी शस्त्रक्रिया यांचे संचालक डॉ शरणकुमार नरुटे यांच्या सांगण्यानुसार, हा आजार पाचन तंत्राचा भाग असलेल्या मोठ्या ग्रंथीवर परिणाम करतो. स्वादुपिंड ही पोटाच्या मागे आणि यकृताच्या खाली असलेली एक लांब ग्रंथी आहे. ते पित्ताशयाच्या जवळ पोटाच्या मागे स्थित असते. त्यात इन्सुलिन तसंच एन्झाईम्ससह हार्मोन तयार करण्यास मदत करणाऱ्या ग्रंथींचा समावेश असतो. हा कॅन्सर स्वादुपिंडाच्या कोणत्याही भागात अनियंत्रित पेशींची वाढ सुरू झाल्यास आढळून येतो.

स्वादुपिंडाच्या कर्करोगाची कारणं काय आहेत?

वय, पोटासंबंधीत संसर्ग, कामाच्या ठिकाणी येणारा ठराविक रसायनांशी संपर्क, आनुवंशिकता, मधुमेह, धूम्रपान, लठ्ठपणा, मद्यपान, अयोग्य आहाराचं सेवन त्याचप्रमाणे आहारात फळं आणि भाजीपाल्याचे समावेश नसणं इत्यादी.

अचानक वजन कमी होणे
भूक न लागणे
त्वचेवर खाज सुटणे
मळमळणे




उलट्या होणे
कावीळ
ओटीपोटात दुखणे
पचनासंबंधी तक्रारी
कोरडी त्वचापाठदुखी

**पायांमध्ये रक्ताच्या गुठळ्या होणे**

डॉ शरणकुमार नरुटे म्हणाले की, ही लक्षणं दिसताच त्याकडे दुर्लक्ष करू नका आणि वेळीच वैद्यकीय सल्ला घ्या. स्वादुपिंडाच्या कर्करोगाची लक्षणं बऱ्याचदा शेवटच्या टप्प्यात दिसून येतात. अशी लक्षणं दिसू लागली आणि प्रदीर्घ काळ टिकून राहिली, तर एकदा स्वादुपिंडाची तपासणी करून घेणे आवश्यक असते.सीटी किंवा एमआरआय स्कॅनद्वारे स्वादुपिंडाच्या कर्करोगाचे निदान करता येऊ शकते. योग्य तपासणी करुन डॉक्टर त्याचे निदान करतात.

# कराळे यांच्या जामीनसाठी असीम सरोदे वर्धेत

# नितेश कराळे यांच्यावर दाखल झालेला गुन्हा हा खोटा



**असीम सरोदे यांचा न्यायालयात युक्तिवाद**

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४ वर्धा** - विधान सभा निवडणुक मतदानाच्या दिवशी वर्धेच्या उमरी मेघे येथे शिक्षक व राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटाचे प्रवक्ते नितेश कराळे यांचा मतदान केंद्राबाहेर बूथवर वाद निर्माण झाला होता. या प्रकरणात पोलिसांनी वेगवेगळे गुन्हे दाखल केले होते, मात्र याच प्रकरणात पोलिसांनी कराळे मास्तरवर ऍट्रॉसिटी कलम अंतर्गत गुन्हा दाखल केला होता. या प्रकरणाचा युक्तिवाद करण्यासाठी ड. असीम सरोदे हे वर्धेत आले होते. त्यांनी न्यायलयात युक्तिवाद करून कराळे यांना जामीन देण्यात यावा ही मागणी करत कराळे यांच्यावर दाखल केलेला हा गुन्हा खोटा आहे असा युक्तिवादही त्यांनी यावेळी केला.महाराष्ट्रात प्रत्येक वर्षी ऍट्रॉसिटी कलमअंतर्गत सहा ते सात हजार गुन्हे दाखल होतात. ऍट्रॉसिटी हा गंभीर गुन्हा आहे आणि यात कोणालाही जामीन मिळायला नको पण नितेश कराळे यांच्यावर दाखल झालेला ऍट्रॉसिटी गुन्हा हा खोटा आहे. एकाच प्रकरणात चार वेगवेगळे गुन्हे दाखल करण्यात आले आहे. ऍट्रॉसिटी कायदा हा एस सी एस टी समाजासाठी महत्वाचा आहे पण राजकीय लोक त्याचा शस्त्रप्रमाणे वापर करून खोटे गुन्हे दाखल करतात असा आरोपही यावेळी असीम सरोदे यांनी केला आहे.

RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

शनिवार दि. १४ डिसेंबर २०२४ शहर/ग्रामिण


# एनआयए पथकाने शहरात ठोकले तळ

## दुसऱ्या दिवशी देखील संशयीत आरोपीची चौकशी



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४ अमरावती–** पाकिस्तानच्या एका संघटनेच्या संपर्कात असल्याच्या संशयावरून एनआयएच्या पथकाने छाया नगर परिसरातून गुरुवारच्या पहाटे आरोपी मोहम्मद मुसेफ मो. ईसा (वय २४) याला ताब्यात घेतले होते. याप्रकरणी तरुणाची गुरुवारच्या रात्री कसून चौकशी करण्यात आली. त्यानंतर संशयित तरुणाला सोडून देण्यात आलं. पण आज शुक्रवारी १३ डिसेंबर रोजी सकाळी पुन्हा त्याची चौकशी सुरू केली आहे. कालपासून एनआयए च्या टीम ने शहरात तळ ठोकले आहे. त्यामुळे वेगवेगळया चर्चा रंगली आहे.चौकशीनंतरही एनआयएचं पथक गेलं नाही. या पथकाने इथेच तळ ठोकला आहे. आज पुन्हा सकाळपासून पथकाने या तरुणाची चौकशी सुरू केली. राजापेठ पोलीस ठाण्यातच त्याच्या चौकशीला सुरुवात केली आहे. कालही या तरुणाची राजापेठ पोलीस ठाण्यात १५ तास चौकशी करण्यात आली होती. हा तरुण पाकिस्तानातील एका संघटनेच्या संपर्कात असल्याचा संशय होता. त्यामुळे त्याची चौकशी सुरू आहे. आज त्याच्या चौकशीतून एनआयएच्या हाती काय लागतं याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे. आजही त्याची चौकशी करण्यात येत आहे. प्राप्त माहितीनुसार गुरुवारच्या पहाटे चार वाजता एन आय ए च्या पथकाने स्थानिक पोलिसांसह छाया नगर परिसरात धाड टाकून येथून आरोपी मो.मुजेफ याला पाकिस्तानी कनेक्शन असल्याच्या संशयावरून ताब्यात घेतले. त्याच्याकडून काल पंधरा तास विचारपूस करण्यात आली. आरोपीकडून पथकाने मोबाईल, आवश्यक कागदपत्र टीसी, मार्कशीट व सुगंधित ईत्र आणि सेंट जप्त केले. त्याच्याकडून विचारपूस केली जात आहे. या प्रकरणाबाबत अत्यंत गुप्तता पाळण्यात येत आहे. आरोपी पाकिस्तानच्या संपर्कात होता आणि त्याला तिथून फोन पण यायचे, या संशयावरून विचारपूस सुरू आहे. आता या प्रकरणात काय समोर येते याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.

### मुलगा निर्दोष,आईचा दावा

राष्ट्रीय तपास यंत्रणेने छाया नगरात कारवाई करत संशयीत आरोपी मो.मुजेफ मो. ईसा (वय २४) याला ताब्यात घेऊन त्याची चौकशी सुरू केली आहे.जैश ए मोहम्मद या संघटनेशी संबंध असल्याचा त्याच्यावर आरोप आहे. या कारवाईनंतर मोहम्मदची आई मीडियासमोर आली. तिने आपला मुलगा निर्दोष आहे, तो मानसिक रोगी आहे. त्याच्यावर उपचार सुरू आहे. त्याला सोडून द्या, अशी मागणी केली आहे.

# महिला वाहकाला १२ लाखांनी गंडविले

## गाडगे नगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४ अमरावती–** नवसारी परिसरातील त्रिमूर्ती नगर मध्ये राहणार्या आणि बडनेरा बस डेपो मध्ये कार्यरत महिला वाहकाला १२ लाखांचा चुना लावण्यात आला आहे. ही घटना गाडगे नगर पोलीस ठाणे अंतर्गत उघडकीस आली आहे. या संदर्भात पोलिसांनी आर्वी डेपो मध्ये कार्यरत एका महिला वाहका विरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

माहितीनुसार, महिला वाहक सन २०११ मध्ये महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ मध्ये नियुक्त झाली होती. तिची पहिली पोस्टिंग वर्धा जिल्ह्यातील आर्वी येथे करण्यात आली होती. येथे काम करत असताना तिची ओळख आरोपी महिले सोबत झाली. आरोपी महिला पण तिथे वाहक होती. दोघींमध्ये मैत्री झाली. सन २०१७ ला पिडित महिला वाहकाची बदली अमरावती विभागात झाली. ती आता बडनेरा डेपोमध्ये कार्यरत आहे. या दरम्यान जानेवारी २०२२ मध्ये पिडित वाहक महिलेने आरोपी महिलेकडे दोन वर्षासाठी बीसी टाकली होती. बीसी स्वरूपात आरोपी जवळ सहा लाख रुपये तिचे जमा झाले. आरोपी महिलेने तिला हे सहा लाख रुपये दिले नाही, उलट तिला सांगितले की मला अजून सहा लाखाची गरज आहे. यामुळे पिडितेने तिला लोन काढून अजून सहा लाख रुपये उसने दिले. आरोपीने बारा महिन्यात १२ लाख रुपये परत करण्याचे आश्वासन दिले होते. बारा महिने झाल्यावर जेव्हा पिडित वाहक महिलेने पैसे परत मागितले तर ती महिला पैसे देण्यास टाळाटाळ करीत होती. यामुळे आपली फसवणुक झाल्याचे लक्षात आल्यावर महिला वाहक महिलेने आरोपी महिलेविरुद्ध गाडगे नगर ठाण्यात तक्रार दिली. पोलिसांनी कलम ४२०, ४०६, ४०९ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास गाडगे नगर पोलीस करत आहे.

# मानेवाडा परिसरात आढळले नवजात बाळ

## कुमारी मातेने जन्म झाल्यावर फेकले

### तरुणीला पोलिसांनी घेतले ताब्यात

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४ वर्धा–** कुमारी मातेने स्त्री जातीच्या नवजात बाळाला जन्म देऊन बेवारस फेकून दिल्याची घटना जिल्ह्याच्या आष्टी तालुक्यातील माणिकवाडा येथे उघडकीस आली आहे. माणिकवाडा परिसरात हे बेवारस नवजात अर्भक आढळून आले होते. सदर बाळाचा जन्म अनैतिक संबंधातून झाला असून अवघ्या काही तासातच आष्टी पोलिसांनी कुमारी आईचा शोध लावला आहे.

प्राप्त माहितीनुसार माणिकवाडा येथे आज शुक्रवारीं १३ डिसेंबरच्या सकाळी दोंन घराच्या मध्ये असलेल्या बोळीत नवजात बाळाच्या रडण्याचा आवाज शेजार्यांना ऐकू येत होता. यामुळे शेजार्यांनी घराच्या मागील बोळीत जाऊन पाहिले असता एका पिशवीत नुकतेच दोन– तीन तासांपूर्वी जन्मलेले नवजात बाळ आढळून आले. याबाबतची माहिती



माणिकवाडा येथील माजी सरपंच रोशन मानमोडे यांनी आष्टी पोलीस व साहूर आरोग्य केंद्राला दिली.

दरम्यान आष्टी पोलिसांनी लगेच घटनास्थळ गाठून याबाबत सखोल चौकशी व तपास केला. यानंतर सदर नवजात बाळ हे बाजूच्या घरच्या कुमारी आईचे असल्याचे आढळून आले. यानंतर आष्टी पोलिसांनी नवजात बाळा सह कुमारी आईला ताब्यात घेतले असून साहूर आरोग्य केंद्रात बाळावर उपचार करण्यात आले. बाळाला फेकून दिल्याने बाळाच्या डोक्याला दुखापत झाली असल्याचे डॉक्टरकडून सांगण्यात आले.

# तेली समाज राज्यस्तरीय परिचय महामेळावा रविवारी

## –रेशीमगाठी बंधन पुस्तिकेचे होणार विमोचन, –माजी महापौर विलास इंगोले यांचा सत्कार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४ अमरावती–** सर्व शाखीय तैलिक समिती व संताजी बहुउद्देशीय शिक्षण प्रसारक संस्थेतर्फे तेली समाज राज्यस्तरीय उपवर वधू परिचय महामेळावा व रेशीमगाठी बंधन पुस्तिकेचा विमोचन सोहळा रविवार १५ डिसेंबर रोजी मोर्शी रोड वरील संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन मध्ये सकाळी दहा ते सायंकाळी पाच वाजेपर्यंत आयोजित करण्यात आलेला आहे. या सोहळ्यामध्ये तैलिक समाज भवनासाठी जागा उपलब्ध करून दिल्याबद्दल माजी महापौर विलास इंगोले यांचा सत्कार करण्यात येणार असल्याची माहिती आज




शुक्रवारीं १३ डिसेंबर रोजी झालेल्या पत्रकार परिषद मध्ये माजी नगरसेवक डॉ.संजय शिरभाते यांनी दिली.

त्यांनी सांगितले की, १५ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता महा मेळाव्याचे उद्घाटन माजी मंत्री जगदीश गुप्ता व काँग्रेस प्रदेशाध्यक्ष संध्या सव्वालाखे यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. स्वागत अध्यक्ष डॉ.संजय शिरभाते आणि राजेश शिरभाते राहणार आहे. विशेष अतिथी म्हणून खासदार बळवंत वानखडे, माजी खासदार अनंतराव गुढे, आमदार सुलभा खोडके, एड. यशोमती ठाकूर, डॉ.सुनील देशमुख, प्रवीण पोटे, विलास इंगोले, आमदार सुमित वानखडे, प्रा वीरेंद्र जगताप, सुनील खराटे, आनंद जवंजाळ, गणेश बारब्दे, नानकराम नेभनानी, लप्पीसेठ जाजोदिया, सुरेश वाघमारे, आमदार चंद्रशेखर बावनकुळे, कृष्णा खोपडे, आमदार विजय वडेट्टीवार, बाळासाहेब मांगुळकर आदि उपस्थित राहणार आहे. कार्यक्रमात उपकार्यकारी अभियंता अरुण गुल्हाने, उपसंचालक नीलिमा टाके, महेश माथुरकर, श्रीराम सुखसोहळे, अविनाश राजगुरे, विनायक गुल्हाने, विनोद अजमिरे, नितीन गभणे, संजय मांडवे, अजय गुल्हाने, अर्चना राजगुरू, अनिल औतकर, नंदू तिखिले, अविनाश टाके, एड. राहुल लोखंडे, कैलास गिरुळकर व इतरांचा सत्कार करण्यात येणार आहे. मेळाव्यात समाज बांधवांना मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन किशोर जीरापुरे, जयंत औतकर, प्रकाश बनारसे, अशोक शेलोरकर, राजेश आगरकर, राजेश शिरभाते, मनोहर उमक, संगीता औतकर, रंजना बनारसे, एड. सुषमा बिसने, संजय मापले, प्रकाश शिरभाते, सागर शिरभाते आदींनी केले आहे.

# क्षुल्लक कारणावरून महिलेला मारहाण

## जुन्या घरकूल परिसरातील घटना

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४ मुर्तिजापूर–** शहरातील जुन्या घरकुल परिसरात शेजारी राहणार्या कुटुंबातील ४ सदस्यांनी २३ वर्षीय महिलेला काठी ,प्लास्टिक पाईपने मारहाण करून अश्लील शिवीगाळ केल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणात पोलिसांनी चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. माहितीनुसार जुन्या घरकुल परिसरातील रहीवाशी मुस्कान परवीन शेख नाजीम (वय २३ वर्ष ) बुधवारी रात्री घरी होत्या. त्यावेळी शेजारी राहणार्या आरोपी अंजुम परवीन , शेख फरीद शेख बाबू , शेख हादीन शेख बाबू , शेख अरशद हे चौघे शिवीगाळ करत होते. या दरम्यान मुस्कान परवीन यांनी चौघांना विचारले की, तुम्ही शिवीगाळ कोणाला करता आहे. यामुळे चिडलेल्या आरोपींनी मुस्कान परवीन हिला लाकडी काठी , प्लास्टिक पाईपने मारहाण करून अश्लील शिवीगाळ करीत जीवे मारण्याची धमकी दिली. या मारहाणीत ती महिला गंभीर जखमी झाली. तिच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहे. मुस्कान परवीन यांनी दिलेल्या तक्रार आणि वैद्यकीय अहवालाच्या आधारे पोलिसांनी आरोपींविरोधात ११८(१), ११५(२), २९६,३५१(२),३(५)बीएनएस नुसार गुन्हा दाखल केला आहे.या याप्रकरणाचा अधिक तपास ठाणेदार अजीत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली रवींद्र कळसकर ,पो. कॉ.ज्ञानेश्वर राणे हे करीत आहे.

# लाडक्या भावांना ६ महिन्याचा कार्यकाळ संपल्यावर उपासमारीची वेळ येणार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४ समुद्रपूर**

महाराष्ट्रातील शैक्षणिक पात्रताधारक युवक आणि युवतींना मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेच्या माध्यमातून महाराष्ट्र सरकारकडून लाडक्या भावांना प्रशिक्षण घेण्याची संधी देण्यात आली.बारावी पास, पदविका आणि पदवी पदव्युत्तर विद्यार्थ्यांना अनुक्रमे सहा,आठ आणि दहा हजार रूपयांचे विद्यावेतन देण्याचे निश्चित केले, पण विद्यावेतन वेळेवर मिळत नाही. तसेच हे विद्यावेतन तुटपुंजे असल्याने प्रशिक्षणार्थींची हेळसांड होऊन त्यांचेवर उपासमारीची वेळ आली असल्याने नियमानुसार काम आणि वेळेवर विद्यावेतन द्यावे. त्याचप्रमाणे प्रशिक्षनाचा कार्यकाळ संपल्यावर दोन महिन्यानंतर आमचे काय होणार आमच्या वर उपासमारीची वेळ येणार का असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे,



महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि कौशल्य व उद्योगता विकास मंत्री मंगल प्रभात लोढा आणि यांनी आमचे लाडके भाऊ जिथे काम करत आहेत तिथेच कायम (पर्मनंट) होतील, असे आश्वासन दिले आहे, हे आश्वासन पूर्ण करावे तसेच, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शपथ घेण्याच्या पुर्वी केलेल्या भाषणात लाडके भाऊ आणि लाडक्या बहिणींच्या योजना आणि त्यांना दिलेली आश्वासने यांना प्राथमिकता दिली जाईल, असे म्हणून युवक आणि युवतींच्या आशा पल्लवीत केल्या आहेत. ह्या आशा निराशेत रूपांतरित होऊ न देता युवक आणि युवतींना कायमस्वरूपी नोकरी किंवा रोजगार उपलब्ध करून द्यावा.

यासाठी प्रशिक्षणार्थी युवक आणि युवतीच्या मागण्या केल्या आहेत,

मानधनात दुप्पट वाढ करण्यात यावी.

प्रशिक्षणार्थींना आहे त्या आस्थापने वर कायमस्वरूपी करण्यात यावे.

# संविधानाची विटंबना करणाऱ्यावर कठोर कारवाई करा

## रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाची मागणी







**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४ अमरावती–** परभणी शहरातील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर असलेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा आणि संविधान उद्देशिकेची तोडफोड करण्यात आली. या घटनेच्या निषेधार्थ परभणीत आंदोलन सुरू आहे. काही हिंसक घटना देखील घडल्या आहे. शहरातही या घटनेचा निषेध करण्यात येत आहे.अशात आज शुक्रवारी १३ डिसेंबर रोजी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया ने या घटनेचा निषेध करत संविधानाची विटंबना करणार्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, या घटनेचा सर्वत्र निषेध होत आहे. त्या समाजकंटकाला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. त्याचे विरुद्ध कठोर कार्यवाही करा. देशाच्या सर्वोच्च स्थानी भारतीय संविधान आहे. राज्यघटनेचा अपमान करणार्या माथेफिरूच्या विरुद्ध योग्य कार्यवाही करण्यात यावी,अशी मागणी करण्यात आली. यावेळी ओमप्रकाश बनसोड, प्रकाश बनसोड, महेंद्र भालेकर, डॉ. प्रदीप दंदे, सुनील रामटेके, अशांत रंगारी, मनोहर घोडेस्वार, वी.के. रामटेके, विजय वानखडे, पुरुषोत्तम जांभुळकर, उत्तमराव बोरकर, उमेश उपाध्याय, पुरुषोत्तम राऊत आदि उपस्थित होते.

**निर्दोष कार्यकर्त्यांवरील कारवाई थांबवा** – वंचित बहुजन आघाडी ची मागणी

परभणी येथील संविधान शिल्पाच्या प्रतिकृतीची विटंबना प्रकरणी दोषींना तत्काळ अटक करण्यात यावी तसेच निर्दोष लोकांवर पोलीस प्रशासनाकडून होत असलेली कार्यवाही थांबविण्यात यावी,अशी मागणी वंचित बहुजन आघाडी ने जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनातून केली आहे. निवेदन मध्ये म्हटले आहे की, डॉ. बाबासाहे आंबेडकर आणि संविधानाच्या अवमानाचे प्रकार वारंवार घडत आहे. अशी कृत्य करणा-या समाजकंटकावर शासनाचा मुळीच वचक राहिलेल्या नाही. अशा घटनांमुळे आंबेडकरी अनुयायांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. अशांवर कठोर कार्यवाही करण्यात यावी. यावेळी निवेदन देतांना राहुल मेश्राम,आनंद इंगळे, सिद्धार्थ भोजने, मनोज चौधरी, प्राजक्ता पिल्लेवान, अजय तायडे, बाबाराव गायकवाड, महावीर टेंबरे, रमेश आठवले, सुनील वानखडे, नितीन काळे, यश बनसोड आदि उपस्थित होते.

### आरोपीला फाशीची शिक्षा द्या– बहुजन आर्मी संघटना

संविधानाचा अपमान करणार्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून आरोपीला फाशीची शिक्षा देण्याची मागणी बहुजन आर्मी संघटनेने जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात केली आहे. जर आठ दिवसात आरोपीवर कार्यवाही नाही झाली तर अमरावती बंद चे आवाहन बहुजन आर्मी द्वारे करण्यात आले आहे. यावेळी प्रवीण वाकोडे, प्रफुल डोंगरे, पंकज साहू, दीप खांडेकर, सतीश वानखडे, प्रेम इंगोले, गोलू स्वर्गे, विकी वानखडे, कार्तिक वानखडे, सुजल वासनिक, सुरज शेळके, सुदर्शन बडगे, नजीर पठाण, अनिकेत रामटेके, विशाल गरुड, शैलेश गोंडाने, गोविंद सूर्यवंशी, कुणाल पाटील, हर्षद ढोणे आदि उपस्थित होते.

# भरधाव इंडिका कारची उभ्या ट्रकला धडक

## –तीन जण गंभीर जखमी –खेड फाट्याजवळ अपघात



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४ मोर्शी**चांदूरबाजार वरून मोर्शी कडे जाणार्या भरधाव चार चाकी गाडीची रेल्वे गेट जवळ उभ्या असलेल्या ट्रकला धडक लागल्याने तीन व्यक्ती गंभीर जखमी झाले. ही घटना गुरुवार दि. १२ डिसेंबर ला रात्री साडेनऊ वाजताच्या दरम्यान घडली. नरखेड कडे जाणारी काचीगुडा एक्सप्रेस रात्रीला येत असल्याने तालुक्यातील खेड फाटा नजीक असलेले रेल्वे गेट बंद करण्यात आले होते.त्यामुळे चांदूरबाजार कडून मोर्शी कडे जात असलेला ट्रक क्रमांक एम एच २७ एक्स ४५ ८५ हे वाहन उभे होते. अशातच मागून येणारे टाटा इंडिका क्रमांक एम एच ३१ सीए ३७२९ हे वाहन मागून भरधाव येऊन उभ्या असलेल्या ट्रकला धडकले. कारमध्ये असलेले दोन युवक व दोन युवती जखमी झाले.घटनेची माहिती उदखेड येथील काही नागरिकांना मिळताच त्यांनी लगेच घटनास्थळावर धाव घेऊन जखमींना मोर्शी येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. जखमीची परिस्थिती गंभीर असल्याने तेथील डॉक्टरांनी जखमींना जिल्हा सामान्य रुग्णालय अमरावती येथे पुढील उपचारासाठी पाठविले.

# सोयाबीनची शासकीय हमीभाव खरेदी बंद पडणार

## गोदाम उपलब्धता नसल्याचा परिणाम



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४ अंजनगाव सुर्जी**

अंजनगाव तालुक्यात शासकीय हमीभावावर सोयाबीन खरेदी ही फार्मर प्रोड्युसर कंपण्या व खरेदी विक्री संघामार्फत सुरू आहेत.यातील खरेदी विक्री संघ सर्वात मोठी खरेदी एजन्सी असुन,यामध्ये बहुसंख्य शेतकर्यांनी नोंदणी करुन नंबर लावला आहे. संघाद्वारे अत्यल्प खरेदी झालेली असतानाच व अनेक शेतकर्यांचे सोयाबीन खरेदी शिल्लक असल्याने या कीरकोळ खरेदीतच सोयाबिन खरेदी नियोजन ढासाळले आहे.आज घडीला केंद्रांमार्फत खरेदी केलेल्या सोयाबीनची अनियमीत हालचाली अभावी सोयाबीनच्या पोत्यांनी गोदाम पूर्णपणे भरले आहे. त्यामुळे उर्वरीत सोयाबीनची खरेदी गोदाम उपलब्ध नसल्यामुळे ठप्प होऊन शासकीय हमीभाव खरेदी केंद्र तात्पुरते बंद पडण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. खरेदी यंत्रणेचे नियोजन शुन्यतेचा फटका मात्र शेतकर्यांना बसणार आहे.

तालुका खरेदी– विक्री संस्था अंजनगांवसुर्जी मार्फत नाफेड द्वारा हमीदराने सोयाबीन खरेदी सुरु आहे.त्याकरीता कृषी ऊत्पन्न बाजारसमीती कडुन एक गोडाऊन खरेदी विक्री संघाला पुरविण्यात आले आहे. परंतु सोयाबीन खरेदी केल्यानंतर सोयाबीनचे पोते ईतरत्र हलविण्याची वा साठविण्याचे नियोजन यंत्रणे कडुन केल्या गेले नसल्यामुळे उपलब्ध गोदामाची क्षमता संपल्यात जमा झाली आहे.त्यामुळे शनिवारी घेतलेले सोयाबीन कुठे ठेवावे, असा प्रश्न खरेदी– विक्री संस्थांपुढे निर्माण झाला आहे.या बाबत खरेदी– विक्री संस्थेकडुन जिल्हाधीकारी कार्यालय,जिल्हा मार्केटींग अधीकारी यांना कळविण्यात आल्यावर दोन्हीही कार्यालयाकडुन कृषी उत्पन्न बाजारसमीतीस गोडाउैनची मागणी करण्यात आली. परंतु बाजार समीती मार्फत गोडाऊन उपलब्धतेस असमर्थता दाखविण्यात आली.त्यानंतर गोदाम उपलब्धते बाबतीत कुठलाच तोडगा निघाला नाही. सदर चुक खरेदी यंत्रणेच्या नियोजन शुन्यतेची असल्याने शनिवार पासुनची सोयाबीन खरेदी बंद झाल्यास त्याचा फटका शेतकरी,हमाल,मापारी व ईतर अवलंबीत घटकांना बसणार आहे. बाजारसमीतीमध्ये गोडावुन खाली असुन समीतीने या पुर्वीच एक गोडावुन खरेदी यंत्रणेस निशुल्क पुरविलेले आहे. त्यामुळे अधीकच्या गोडावुन ची मागणी केली असता समीती मार्फत गोडाऊन भाडे ची मागणी केली आहे. मात्र सोयाबीन खरेदी यंत्रणे मार्फत गोडाऊन निशुल्क मागणी केली जात असल्याने दोन्हीही संस्थेच्या कलगीतु-यात शेतकर्यांचा बळी जाणार येवढे निश्चित. असे असताना शासकीय खरेदी यंत्रणेने तातडीने समन्वय साधुन गोडाऊन उपलब्द करुण देण्याची मागणी नोंदणी झालेल्या व खरेदी राहलेल्या सोयाबीन उत्पादक शेतकर्यांकडुन होत आहे.

अंजनगाव सुर्जी शहरात राज्य वखार महामंडळाचे एक भले मोठे गोदाम बांधण्यात आले होते.परंतू भ्रष्टाचाराच्या किडीमुळे हे गोडाऊन कधिच उपयोगात आले नसून बांधले तेव्हापासून ते बंद व जर्जर अवस्थेत आहे. आज हे गोदाम सुस्थीतीत असते तर शासकीय खरेदीच्या उपयोगी पडले असते अशी चर्चा शेतकरीवर्गात आहे.

> कृषी उत्पन्न बाजारसमीतीने एक गोडाऊन पुर्वीच सोयाबीन शासकीय खरेदिस निशुल्क उपलब्ध करुण दिले आहे.समीतीचे कामकाज तोंडी आदेशावर चालत नाही.अधीकच्या गोडावुन मागणी संदर्भात तांत्रिक अडथडे असुन तांत्रिक बाबींची पुर्तता केल्यावर गोडाऊन उपलब्ध करुण देण्यात येईल.
>
> **–ॲड.जयंत जि.साबळे,** सभापती
> कृ.ऊ.बा.स.अंजनगांव सुर्जी

# ट्रॅक्टर चालविताना फिट आल्याने तरुणाचा मृत्यू

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४ अमरावती–** ट्रॅक्टर चालवीत असताना तरुणाला अचानक फिट आल्याने तो ट्रॅक्टर समोर पडला. या अपघातात त्याचा मृत्यू झाला आहे. ही घटना आज शुक्रवारी १३ डिसेंबर च्या दुपारी अशोक नगर परिसरात समोर आली आहे. यामुळे गावात शोककळा पसरली आहे.

प्राप्त माहितीनुसार अशोक नगर परिसरात राहणारा आशीष हटवार (वय ३५) दररोज प्रमाणे गुरुवारी दुपारी शेतात गेला होता आणि सायंकाळी ट्रॅक्टर घेऊन शेतातून परत येत होता. त्यावेळी अचानक ट्रॅक्टर चालवीत असताना त्याला फिटचा झटका आला आणि तो ट्रॅक्टर समोर पडला. ट्रॅक्टर त्याच्या शरिरावरून गेला. या अपघातात तो गंभीर जखमी झाला होता. तेथून जाणार्या नागरिकांनी त्याला धामणगाव उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले.

जिथे उपचारादरम्यान शुक्रवारच्या सकाळी त्याचा मृत्यू झाला. पोस्टमार्टम झाल्यानंतर त्याचा मृतदेह नातेवाईकांच्या स्वाधीन करण्यात आला.

# महसूल सेवक रविंद्र तायडे यांच्या उपोषणाल यश

## बिंदू नामावली मंजूर, महसूल सेवकांची जेष्ठता यादी देखील जाहीर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४ अमरावती** कोतवालांमधून शिपाई संवर्गामध्ये नियुक्ती देण्याकरिता बिंदू नामावली जिल्हाधिकारी यांच्यामार्फत विभागीय आयुक्त कार्यालय अमरावती यांच्याकडे मंजूरीकरिता पाठविल्या जात असते. मात्र ही प्रक्रिया बरेच दिवसापासून प्रलंबित होती. याचा पाठपुरावा वारंवार महसूल सेवक रवींद्र तायडे यांनी केला होता. मात्र त्या पाठपुराव्याला यश येत नसल्यामुळे त्यांनी १० डिसेंबर २०२४ पासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले होते.

दरम्यान महसूल सेवक रवींद्र तायडे यांच्या उपोषणाची विभागीय आयुक्त निधी पांडेय यांनी तत्काळ दखल घेत १२ डिसेंबरला बिंदू नामावली मंजूर केली आहे तसेच जिल्हाधिकारी यांनी महसूल सेवकांची जेष्ठता यादी देखील जाहीर केली आहे. भरती प्रक्रिया राबवत असताना या दोन्ही गोष्टी महत्त्वाच्या होत्या. त्यामुळे रवींद्र तायडे यांच्या आमरण उपोषणाला यश आले आहे.या आंदोलनाचे फलित म्हणजे बिंदुमानामावली नामावली मंजूर होऊन सेवा जेष्ठता यादी प्रकाशित झाली आहे. यासंदर्भात रवींद्र तायडे यांना जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत माहिती देण्यात आली आहे.

१२ डिसेंबरला सायंकाळी सामाजीक कार्यकर्ते धनंजय गुळदे यांच्या माध्यमातून उपोषणाची सांगता झाली. महसूल सेवक रवींद्र तायडे यांना या विषयाचा पाठपुरावा करण्यासाठी शरद गाढवे, सुनील अढाऊ, प्रवीण माहुलकर, रवींद्र देशकर, भूषण तसरे, प्रशांत उके,संदीप पळस पगार, राहुल राजस, शुद्धोधन रौराळे, शितल कुलकर्णी, हराह निलोफर, राजेश मोहकर, यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते संदीप गेडाम, दिवाकर वानखडे, यांनी सहकार्य केले. त्या सर्वांचे देखील आभार देखील रवींद्र तायडे यांनी मानले.

# ढोल-ताशे,शंखनाद व डमरूच्या गजरात संत अच्युत महाराजांच्या समाधीवर ड्रोन 'पुष्पवृष्टी'

## श्री क्षेत्र शेंदूरजना बाजार नगरी दुमदुमली –हजारो भाविकांचे वेधले लक्ष –याची देही,याची डोळा प्रचिती





**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४ तिवसा**–ढोल-ताशे,डमरू व शंखनादाचा गजर करीत श्री क्षेत्र शेंदूरजना बाजार येथे संत अच्युत महाराजांच्या महासमाधीवर आज ड्रोन ने पुष्पवृष्टी करण्यात आली. या पुष्पवृष्टी ने हजारो भाविकांचे अक्षरशः लक्ष वेधून घेतले होते.ज्यामुळे अक्षरशः शेंदुरजना बाजार नगरी दुमदुमून गेली होती.दत्तजयंती महोत्सव व श्री संत अच्युत महाराज जन्मशताब्दी समारोपीय उत्सवानिमित्त श्री क्षेत्र शेंदूरजना बाजार येथे आज'याची देही,याची डोळा'याची प्रचिती भाविकांना आली.महाराजांच्या महासमाधीवर आज सकाळी १२ वाजता ड्रोन ने २०० मीटर अंतरावरून पुष्पवृष्टी करण्यात आली.या पुष्पवृष्टी कडे सर्व भाविकांचे आकाशाच्या दिशेने एकटक लक्ष लागून होते. आज सकाळी यज्ञमंडपातून संत अच्युत महाराजांच्या महासमाधीकडे कलश नेण्यात आला.या कलशाचे पूजन हभप अशोकानंदजी कव्हर महाराज यांचे हस्ते करण्यात आले. तेव्हा १०८ कुंडयाद्वारे स्थापित यज्ञाची पूर्णाहुती करून रथाद्वारे कलशाची मिरवणूक मंदिर परिसरातून काढण्यात आली. ढोल-ताशे,डमरू,शंखनादाच्या गजरात कलश स्थापना व पूजन करून ड्रोन द्वारे २०० फुटवरून समाधीवर पुष्पवृष्टी करण्यात आली. अतिशय मन प्रसन्न करणारा हा भावविभोर क्षणाचे उपस्थित भक्तगण साक्षीदार बनून येथील भक्तिमय वातावरणाचा अनुभव घेतला.हा पुष्पवृष्टी सोहळा पार पाडण्यासाठी संस्थान च्या सर्व पदाधिकारी व सेवकांनी अथक परिश्रम घेतले.

# सरकार घेणार मोठा निर्णय? अपात्र बहीणींचे काय?

## लाडकी बहिण योजना लाभार्थ्यांची घरोघरी जाऊन तपासणी
## अपात्र असल्यास लाडक्या बहीणीवर गुन्हा दाखल होणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १४ नांदगाव खंडेश्वर**

लाडकी बहीण योजनेचा लाभ राज्यात २.३ कोटी महिलांना मिळत आहे. सर्वांना डिसेंबर महिन्याच्या हप्त्याची प्रतिक्षा आहे. लाभ घेणार्या बहीणी संतुष्ट असताना असंतुष्ट बहीणीनीनी महायुतीस भरभरुन मतं दिलीत त्यांचं काय असा संतप्त बहीणी सवाल करीत आहेत.




अपात्र असल्यास लाडक्या बहीणीवर गुन्हा दाखल होणार अशी धक्का देणारी बातमी समोर आली आहे. मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजने अंतर्गत सर्वसमावेशक कागदपत्रांची पडताळणी केली जाणार आहे. त्याचाच एक भाग म्हणून राज्याच्या महिला आणि बाल विकास विभागाचे अधिकारी घरोघरी जाऊन कागदपत्रांची उलट तपासणी करणार आहेत. प्रत्येक लाभार्थ्यांच्या घरांना प्रत्यक्ष भेटी दिल्या जातील, त्यानंतर सर्व डेटा तपासला जाईल. आणि पात्र, अपात्र ठरवले जाईल.

लाडकी बहीण योजनासाठी ज्यांनी खोटे दावे केलेत, त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात यावा, असा प्रस्ताव महिला आणि बाल विकास विभागाने केला आहे. तसेच चुकीच्या पद्धतीने मिळालेले लाभ परत करण्याचा पर्याय दिला जाईल, असे एका वरिष्ठ अधिकाऱ्यांनी टाइम्स ऑफ इंडियाला सांगितले.

महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यामध्ये लाडकी बहीण योजनेच्या कागदपत्रांची पडताळणी केली जाणार आहे. जिल्हा आणि विभागीय स्तरावर तपासणी केली जाईल, असे महिला आणि बाल विकास विभागाच्या अधिकाऱ्याने सांगितले.

लाडकी बहीण योजनेचे निकष बदलले का? आदिती तटकरेंनी थेट पत्रकच जाहीर केलं

महिला आणि बाल विकास विभागाकडे लाडकी बहीण योजना फसवणुकीसंदर्भात लाभार्थींबद्दल २०० हून जास्त तक्रारी आल्या आहेत. त्यामुळे २-५ कोटी अर्जांपैकी एक टक्के म्हणजेच २.५ लाख अर्जांची पुन्हा एकदा पडताळणी करण्याचा निर्णय घेण्यात आलाय. त्यासाठी दोन ते तीन महिन्याचा वेळ लागेल, असा अंदाज आहे. १५०० रूपयांवरून २१०० रूपये हप्ता करण्याबरोबरच पुनर्तपासणी करणं गरजेचं आहे, असे अधिकाऱ्याने सांगितले.

खोटी कागदपत्रे अथवा पात्रता नसताना लाडकी बहीण योजनेचा अनेकांनी लाभ घेतला आहे. तशा तक्रारी प्रशासनाकडे आल्या आहेत. त्यामुळेच लाडकी बहीण योजनेच्या अर्जांची पडताळणी होणार आहे. अपात्र असणार्यां महिलांना योजनेतून वगळले जाईल.

लाभार्थींना स्वत:हून योजनेतून बाहेर पडण्याचे पर्याय देण्यात आले आहेत. त्यासाठीचा जीआर जारी करण्यात आला आहे. याआधीच महिला आणि बाल विकास विभागाने खोट्या कागदपत्राद्वारे लाभ घेणाऱ्यांच्या तक्रारी करण्याचे आवाहन केलेय, जेणेकरून त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल, असे अधिकाऱ्याने सांगितले.

# सिकची ट्रस्टच्या सेवा- सप्ताह निमित्य विविध सामाजिक कार्यक्रम संपन्न

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १४ अमरावती**

वलगाव येथील प्रेमकिशोर सिकची चॅरीटेबल ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष व ज्येष्ठ समाजसेवक प्रेमकिशोर सिकची यांचे ८५ व्या वाढदिवसानिमित्त सेवा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये विविध सामाजिक ,शैक्षणिक , आरोग्य, महीला , स्वच्छता, पर्यावरण , परसबाग ईत्यादी विषयावर सामाजिक उपक्रम मोठ्या प्रमाणात राबविण्यात आले. त्यासोबतच विविध विषयावरील वक्त्यांची मार्गदर्शनपर व्याख्यानेही आयोजित करण्यात आली होती. याकरिता वलगाव वासियांनी लक्षनिय सहभाग नोंदवला होता. सर्वप्रथम कार्यक्रमाची सुरुवात जुना बस स्टँड वलगाव येथे ग्राम स्वच्छता अभियानाने करण्यात आली यामध्ये प्रामुख्याने वलगाव ग्रामपंचायतला कचरा कंटेनर चे वाटप करण्यात आले याप्रसंगी वलगाव ग्रामपंचायतचे सरपंच सुधीर उगले , सदस्य व स्वच्छतादुत दशरथदादा मानकर तसेच ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते. त्यानंतर महात्मे आय बँक व आय हॉस्पिटल अमरावती यांचे वतीने सिकची मंगलम येथे निशुल्क नेत्ररोग तपासणी शिबिर घेण्यात आले



यामध्ये १७४ गरजू ग्रामवासीयांनी निशुल्क नेत्ररोग तपासणी करून घेतली त्यापैकी ६९ रूग्णाना माफक दरात चष्मे वाटप करण्यात आले व २१ रूग्णांना शस्त्रक्रियेसाठी सल्ला देण्यात आला. ज्यांना मोतीबिंदू व डोळ्यांचे इतर आजार आहेत त्यांच्या शस्त्रक्रीयेसाठी सिकची ट्रस्ट तर्फे सर्वतोपरी सहाय्यता करण्यात येणार आहे.

सतीनगर ग्रामवसियांना कचरा निर्मूलनाचे महत्व पटवून देऊन त्यांचेकडून सतीनगर परिसरातील साफ सफाई करण्यात आली व त्यानंतर त्यानंतर परस बागेसाठी टोमॅटो , बैंगण , मिरची केळी ई रोपांचे वाटपही करण्यात आले. तसेच वलगांव येथील पाणीटंचाई प्रश्नावर कार्य करतांना जुण्या विहीरीचे पुणर्जीवन व पुणर्भरण उपक्रमाअंतर्गत मारवाडी पूरा, धनगरपूरा व सावता चौकातील विहीरीचे काम करण्यात आले. व जूनी पाणी वापराची पद्धत पुनर्जिवीत करण्याचे कार्य सुरू करण्यात आले.तसेच सिकची वाचनालय येथे महीला सक्षमीकरण अंतर्गत उद्यमी पुरस्कार प्राप्त कविताताई विधळे यांचे महिला उद्योगाविषयी मार्गदर्शन आयोजित करण्यात आले होते.

जिल्हा सामान्य रुग्णालय, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आरोग्य तपासणी शिबिरामध्ये लिपीड प्रोफाईल, ईसीजी , व्हिडीआरएल , बीपी , शुगर ईत्यादी महत्वपूर्ण टेस्ट करण्यात आल्या .यामध्ये ८० जणांनी सहभाग नोंदवून उत्साहात भाग घेतला.याकरिता जिल्हा शल्य चिकित्सकश्री. दिलीप सौंदळे व त्यांची टिम उपस्थित होती व रेडीयंट हॉस्पीटल तर्फे एउत्र काढण्यासाठी डॉ यासीर व त्यांचे सहकारी सहभागी झाले होते.

समारोपीय कार्यक्रमात नागपूर येथील प्रसिद्ध सामाजिक संस्था जनआक्रोश तर्फे विद्यार्थ्यांना रस्ते व अपघात या विषयावर महत्वपुर्ण मार्गदर्शन करताना ग्रामीण भागामध्ये जास्त अपघात होतात .तसेच दरवर्षी १६१००० पेक्षा जास्त मृत्यु यामुळे होतात असे प्रतिपादन जनआक्रोश संस्थेचे श्री.खांडेकर यानी केले. तसेच या कार्यक्रमासाठी प्रसिद्ध बालरोग तज्ज्ञ सौ.माधुरी अग्रवाल उपस्थितांना मार्गदर्शन करताना मुलांना स्वास्थ हा आपला सगळ्यात जवळचा मित्र असुन त्याला सांभाळून सर्व कामे करण्याचा सल्ला दिला तसेच सिकची ट्रस्टतर्फे चालवण्यात येणाऱ्या सामाजिक उपक्रमांची प्रशंसा केली. समारोपीय कार्यक्रमात वलगावमध्ये स्वच्छतेसाठी काम करणाऱ्या ग्रामपंचायत सदस्य स्वच्छताहुन दशरथदादा मानकर, कचरागाडी ड्रूयूव्हर जितु मेश्राम, स्वच्छता कामगार बाळूभाऊ यांचा सन्मान करण्यात आला तसेच वलगावमध्ये विहीर पुर्नभरण व पुनर्जिवन याची संकल्पना मांडणारे व सिकची ट्रस्टला सहकार्य करणारे जलदुत मनोज खवड यांचा सन्मान करण्यात आला. तसेच सतीनगर येथील मंगेश तायडे यांचा सन्मान करण्यात आला. रामचंद्रजी निर्मळ ईंग्लिश प्रायमरी व प्रेमकिशोर सिकची हायस्कुल शाळेच्या विविध स्पर्धामध्ये विजयी झालेल्या व सहभाग घेतलेल्या विद्यार्थ्यांचा मेडल, प्रशस्तीपत्र व रोख रक्कम देऊन सन्मान करण्यात आला. समारोपीय कार्यक्रमासाठी वलगावचे सरपंच सुधीरभाऊ उगले अध्यक्ष म्हणून लाभले होते तसेच डॉ. माधूरी अग्रवाल , कृषी मित्र गजानन गिरोलकर आर्ट ऑफ लिव्हींगचे प्रशिक्षक सुधीरभाऊ मसाने, रेडीयंट हॉस्पीटलचे गजानन बाळापूरे, श्री. कुकटकर यांची प्रमुख उपस्थित होते. तसेच सेवा-सप्ताह च्या अनुषंगाने सिकची ट्रस्टतर्फे स्वर्गरथ वलगावासीयांसाठी डोनेट करण्यात येणार आहे.

# सुशीला सूर्यवंशी मॅनेजमेंट इन्स्टिट्यूट व भारतरत्न डॉक्टर एपीजे अब्दुल कलाम महाविद्यालयाची अमरावती विद्यापीठ माहिती ज्ञान स्त्रोत केंद्राला भेट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १४ अमरावती**

शिवाई सोशल अँड मेडिकल ट्रस्ट द्वारा संचालित सुशीला सूर्यवंशी मॅनेजमेंट इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी ऍडव्हान्समेंट तसेच भारतरत्न डॉक्टर एपीजे अब्दुल कलाम कॉलेज फॉर यु जी अँड पीजी मिलेनियम स्किल्स इनोवेशन इंक्युबॅशन अँड रिसर्च महाविद्यालय अमरावती यांनी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ येथील ज्ञान स्तोत्र केंद्राला दि ११/१२/२०२४ रोजी भेट दिली.



पुस्तके ही प्रेरणेचे भांडार आहेत कारण ती वाचून आपल्याला जीवनात चांगले कार्य करण्याची प्रेरणा मिळते आपले विचार, भावना दुसऱ्यापर्यंत पोहोचवण्याचा सर्वात उत्तम मार्ग म्हणजे पुस्तक होय. याच पुस्तकाचे महत्त्व जाणून घेण्यासाठी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी अमरावती विद्यापीठ येथील माहिती ज्ञान स्त्रोत केंद्राला भेट दिली. माहिती ज्ञान स्त्रोत केंद्राच्या संचालिका डॉ. वैशाली गुडधे यांनी विद्यार्थ्यांना पुस्तकाचे महत्व समजावून सांगून मेंडले रेफरन्स मॅनेजर या प्रोग्राम बद्दल माहिती देऊन विद्यार्थी जीवनात पुस्तकाचे अनन्य साधारण महत्व काय आहे हे समजावून सांगितले. माहिती ज्ञान स्त्रोत केंद्रातील गजानन इंगळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व ज्ञान स्त्रोत केंद्रातील देवघेव विभाग, नियतकालिक विभाग, ग्रंथोपार्जन विभाग, अशा विविध विभागांची विद्यार्थ्यांना माहिती करून दिली व विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पाडली. तसेच डॉ. विशाल बापटे यांनी विद्यार्थ्यांना प्लेगरीझम बद्दल माहिती देऊन विद्यार्थ्यांची ग्रंथालया बद्दलची आस्था वाढवून विद्यार्थ्यांना ग्रंथालयात जाण्यासाठी प्रेरित केले. प्रा.ज्योती गेडाम यांनी विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या डाटाबेस बद्दल माहिती दिली. या विद्यापीठीय भेटीसाठी सुशीला सूर्यवंशी महाविद्यालयाच्या संचालक डॉ. पल्लवी मांडवगडे, व भारतरत्न एपीजे अब्दुल कलाम महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. अरुणा काकडे यांनी मार्गदर्शन केले

यावेळी महाविद्यालयाच्या ग्रंथपाल राखी गचके, प्रा. साक्षी देशमुख, प्रा. सिमरन मेश्राम, अक्षय काळे व बहुसंख्येने विद्यार्थी उपस्थित होते. आजचे युग हे इंटरनेटचे युग आहे इंटरनेट हा ज्ञान प्राप्त करण्याचा एक सोपा मार्ग आहे, परंतु पुस्तकांचे महत्त्व हे आजही कायम आहे ग्रंथालयातील ही भेट विद्यार्थ्यांसाठी अतिशय उपयुक्त ठरली. विद्यापीठ ग्रंथालयाची भेट यशस्वी होण्यासाठी संस्थेच्या अध्यक्षा डॉ. स्मिता सूर्यवंशी, सचिव प्रा.दिनेश सूर्यवंशी, अभय सूर्यवंशी यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.

# नांदगाव खंडेश्वर आयटीआयमध्ये रक्तदान शिबीर संपन्न

## जिल्हा सामान्य रूग्णालयातील चमुने केले रक्त संकलनाचे कार्य



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १४ नांदगाव खंडेश्वर**

नांदगाव खंडेश्वर येथील एकनाथराव रानडे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) मध्ये शुक्रवारी (ता. १३) रक्तदान शिबीर उत्साहात संपन्न झाले. यावेळी ३६ कर्मचारी - प्रशिक्षणार्थ्यांनी रक्तदान शिबीरात सहभाग घेतला. सदर शिबीर प्राचार्य नंदनसिंह भुकवाल व प्रभारी प्राचार्य सुरेश मेंढे यांच्या मार्गदर्शनात पार पडले.

सदर कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून नांदगाव हायस्कूलचे मुख्याध्यापक प्रदीप ठाकरे यांची उपस्थिती होती. तर यावेळी बोलतांना प्रभारी प्राचार्य सुरेश मेंढे यांनी म्हटले की, रक्तदानासारख्या पवित्र कार्याची खऱ्या अर्थाने आवश्यकता आहे. रक्तदान ही आजच्या काळाची गरज असून, अनेकदा वेळेवर रक्त मिळत नसल्याने मृत्यू होण्याच्या घटना कानावर येतात. समाजात रक्तदानाविषयी असणारे गैरसमज दूर करून जास्तीत जास्त लोकांमध्ये जनजागृती करून रक्तदान वाढवणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी अधिकाधिक लोकांनी पुढे येणे गरजेचे आहे असे मत व्यक्त केले. यानंतर प्रदीप ठाकरे, सुरेश मेंढे यांच्यासह संस्थेतील शिल्प निदेशक प्रफुल्ल कचरे, वैभव केणे, सचिन वाहणे, समिर भुरे, सुरक्षारक्षक जयेश काटोलकर यांसह प्रशिक्षणार्थ्यांनी रक्तदान केले. या शिबीराच्या आयोजनाकरिता शिल्पनिदेशक दीपक गिरी यांचे विशेष सहकार्य लाभले. रक्त संकलनाचे कार्य जिल्हा सामान्य रूग्णालय, अमरावती येथील रक्तसंकलन अधिकारी डॉ. राहूल खराटे, जनसंपर्क अधिकारी योगेश पानझाडे, वैज्ञानिक अधिकारी राखी ढाबरे, अधिपरिचारीका संगिता गायधने, परिचर मंगेश उमप, वाहनचालक प्रविण कळसकर या चमुने केले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता शिल्प निदेशक राजेंद्र उन्होंणे, दिपक गिरी, तुषार जैन, प्रफुल्ल कचरे, निलेश देऊळकर, राम इखार, शहजाद खान, सुशिल सरोदे, चिन्मय दहाट, सागर डांगे, वैभव केणे, प्रशांत पोच्वी, सचिन वाहणे, सचिन दुवधने, समिर भुरे, मयुरी वसुले, रूचिका डोरस, संगिता बिबेकर, दिपाली लोखंडे, रूपाली लांडे, कर्मचारी अनंत खेडकर, निलेश खंडार, मनोज पकडे, राजकुमार कांबळे, गौरव मोगरे, ऋषभ मडावी, सुरक्षारक्षक धिरज तायडे, जयेश काटोलकर यांच्यासह प्रशिक्षणार्थ्यांनी परिश्रम घेतले.

# श्री अंबादेवी संस्थान ग्रंथालयात देश का प्रकृती परीक्षण कार्यक्रम संपन्न

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १४ अमरावती**

श्री अंबादेवी संस्थान ग्रंथालयामध्ये ह.व्या.प्र.मंडळ द्वारा संचालित देश का प्रकृती परीक्षण कार्यक्रम दि.४/१२/२०२४ (बुधवार) रोजी संपन्न झाला.



कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. विनय करमरकर (श्री अंबादेवी हॉस्पिटल) तसेच मार्गदर्शक - डॉ. विलोभ भारतीय (विदर्भ आयुर्वेद महाविद्यालय) ग्रंथालयाचे अध्यक्ष- श्री. सुरेंद्र बुरंगे, सचिव-सौ.दीपाताई खांडेकर यांच्या हस्ते दिप्रज्वलन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्तविक व सूत्रसंचालन ग्रंथालय सचिव सौ.दीपाताई खांडेकर यानी केले. प्रास्तविकामध्ये त्यांनी कार्यक्रमाविषयी थोडक्यात माहिती दिली.


आरोग्य तपासणीसाठी विदर्भ आयुर्वेद महाविद्यालयाचे वैद्यकीय प्रशिक्षणार्थी अंतिम वर्षाचे विद्यार्थी १) श्री. गुलाबराव भंगाळे २) कु. प्राची चंद्रकांत बंडेवार ३) कु.श्रेया अंबाडकर ४) चि. आदित्य चव्हाण ५) काशीब खान हे विद्यार्थी उपस्थित होते. भाषणामध्ये डॉ. विलोभ भारतीय यांनी स्वतःची प्रकृती आपण जपावी तसेच या कार्यक्रमाद्वारे देश का प्रकृती परीक्षण करून एक सुदृढ देश घडवायचा आहे याबद्दल सांगितले. आजची तरुण पिढी ही देशाचे भविष्य असून त्यांचआरोग्य हे सुदृढ असायलाच पाहिजे. यावेळी स्पर्धा परीक्षा अध्ययन कक्षातील विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करून त्यांच्या आरोग्याविषयी माहिती त्यांना प्रकृती ॲप द्वारे देण्यात आली. कार्यक्रमाला ग्रंथपाल-डॉ. रोहिणी पडित स्पर्धा परीक्षा अध्ययन कक्षातील विद्यार्थी उपस्थित होते.

# दर्यापूर बाजार समिती यार्डवर कापूस विक्रीकरीता शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १४ दर्यापूर**

दर्यापूर कृषी उत्पन्न बाजार समितीने शेतकऱ्यांना केंद्रस्थानी ठेऊन बाजार समिती यार्डवर कापूस हर्हास करण्यात यावा असा निर्णय घेण्यात आला या निर्णयाने शेतकऱ्यांच्या खिशात अधिकचे पैसे यावे या हेतूने हा निर्णय घेण्यात आला या निर्णयाचे शेतकरी वर्गाकडून स्वागत करण्यात आले. इतकच नव्हे तर कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी आपल्या दर्यापूर

## रोज २०० ते २५० कापूस गाळ्यांची आवक



मुख्य बाजार व येवदा उपबजार दोन्ही मिळून येथे १५० ते २५० कापूस गाड्या बाजार समिती यार्डवर आणून बाजार समितीच्या निर्णयाला चांगला प्रतिसाद दिला किंबहुना देत आहेत. सी. सी. आय तर्फे कापूस खरेदी होत असताना शेतकऱ्यांची कुठलीही पिळवणूक न होता कापसाला चांगला भाव मिळत असल्याने शेतकरी समाधानी असल्याने इतक्या मोठ्या प्रमाणात बाजार समिती यार्डवर कापूस विक्री करिता आणत असल्याचे यावरून सिद्ध होत आहे व शेतकरी सि. सि. आय ला कापूस विक्री करण्यास अधिक पसंती देत असल्याचे चित्र बाजार समिती यार्डवर दिसत आहे.

# रामचंद भागचंद ट्रस्टतर्फे हिंगणगाव जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना 'मायेची ऊब'

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १४ धामणगाव रेल्वे**

रामचंद भागचंद ट्रस्टतर्फे तालुक्यातील हिंगणगाव जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना कडाक्याच्या थंडी पासून संरक्षण मिळावे म्हणून उबदार स्वेटर देऊन त्यांना कडाक्याच्या थंडीत मायेची ऊब दिली.या उपक्रमाचे सर्वस्तरातून कौतुक होत आहे.



तालुक्यातील हिंगणगाव येथील जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक मराठी शाळा येथे रामचंद भागचंद ट्रस्टतर्फे अरविंद अग्रवाल यांच्या हस्ते शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना स्वेटर वितरण करण्यात आले.यावेळी मुख्याध्यापक मोहन देशमुख,शिक्षक वसंत वासनिक,रविकांत पवार,विजय ब्राम्हण,रंजना मेंढे,प्रगती तिजारे यांच्यासह शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी व आदी प्रामुख्याने उपस्थित होते. या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत.

ज्या समाजातून आपला जन्म झाला,त्या समाजाला काही तरी देणे हे आपले आद्य कर्तव्य आहे.विद्यार्थ्यांना काहीतरी मदत या भावनेने या रामचंद भागचंद ट्रस्टतर्फे हा उपक्रम राबविण्यात आला.

# संतनगरीला कर्मभूमी समजून मातृभूमीचे ऋण फेडण्यासाठी संत गाडगेबाबांच्या विचारांचा वसा अविरतपणे जोपासणार : आ.सौ. सुलभाताई खोडके

## अमरावती येथील श्री संत गाडगे महाराज यांच्या ६८ व्या पुण्यतिथी यात्रा महोत्सवाला सुरुवात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १४ अमरावती :** कर्मयोगी संत गाडगेबाबा यांनी संपूर्ण महाराष्ट्राला स्वच्छता, सामाजिक सुधारणा व मानवतेचा संदेश दिला. त्यांच्या विचारातून अमरावती शहराच्या सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक विकासाची जडण -घडण झाली आहे. अमरावतीच्या विकासावर सुद्धा गाडगे बाबांच्या विचारांचा प्रभाव असल्याने संतनगरी म्हणून अमरावतीचा लौकिक आहे. अमरावतीमधील संत गाडगेबाबा समाधी स्थळ हे आपले श्रद्धास्थान व प्रेरणास्थळ असून संतनगरीला कर्मभूमी समजून मातृभूमीचे ऋण फेडण्यासाठी संत गाडगेबाबांच्या विचारांचा वसा अविरतपणे जोपासणार असल्याचे प्रतिपादन अमरावतीच्या आमदार सौ. सुलभाताई संजय खोडके यांनी केले.



संत गाडगे महाराज समाधी मंदिर ट्रस्ट गाडगे नगर अमरावतीच्या वतीने शनिवार दिनांक १४ डिसेंबर ते २१ डिसेंबर पर्यंत आयोजित श्री. संत गाडगेबाबाचा ६८ वा पुण्यतिथी महोत्सव २०२४ च्या शुभारंभ प्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी संस्थेचे विश्वस्त तथा श्री गाडगे महाराज मिशन मुंबईचे उपाध्यक्ष बापूसाहेब देशमुख, संचालक सागर देशमुख, समाजसेवक डॉ. राजकुमारजी लंगडे, डॉ. नरेशचंद्रजी काठोळे , समाजभुषण- भरत रेळे महाराज, संचालक गजानन देशमुख, व्यवस्थापक प्रकाश महात्मे, अतुल रेळे आदी मान्यवर उपस्थित होते.

सर्वप्रथम हरिनामाच्या गजरात आ.सौ. सुलभाताई खोडके यांचे भव्य स्वागत करण्यात आले. याप्रसंगी आमदार महोदयांच्या हस्ते तीर्थस्थापना ,बाबांच्या समाधीचे पूजन व आरती करून पुण्यातिथी महोत्सवाचा शुभारंभ करण्यात आला. तसेच अमरावती विधानसभा मतदार संघातून दुसऱ्यांदा निर्वाचित झाल्याबद्दल आ.सौ. सुलभाताई खोडके यांचा संस्थेचे विश्वस्त बाबसाहेब देशमुख यांनी शाल-श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करीत अभिनंदन केले.

पुढे बोलतांना आ.सौ. सुलभाताई खोडके म्हणाल्या की संत गाडगे बाबा यांनी दिन-दुखी, गोर-गरीब, निराश्रित ,अनाथ , दिव्यांग व वृद्धांच्या सेवेत आपले अख्य आयुष्य खर्ची घातले. बाबांच्या याच समाजसेवेचा वसा आजपर्यंत समाधी मंदिर ट्रस्ट जोपासत आली आहे. संस्थेचे सेवाभावी उपक्रम हे मानवतेचा संदेश देत असून या कार्याला आपणही हातभार लावणार असल्याचे सांगून मंदिर स्थळी चांगल्या सुविधा निर्माण करण्यासाठी प्रयत्नरत राहू अशा विश्वास आ.सौ. सुलभाताई खोडके यांनी व्यक्त केला .

दरम्यान बाबांच्या वाहनाचे पूजन करून आरोग्य शिबिराचे उद्घाटन सुद्धा करण्यात आले. आगामी १० दिवस चालणाऱ्या पुण्यतिथी महोत्सवात सामाजिक प्रबोधन कार्यक्रम, कीर्तन, हरिपाठ, व्याख्यान, सामाजिक शिबिरे तसेच गरजूनां ब्लँकेट वाटप व भोजनदान कार्यक्रम संपन्न होणार आहे. बाबांच्या ६८ व्या पुण्यतिथी महोत्सवात सर्वांनी सहभागी होण्याचे आवाहन संस्थेचे विश्वस्त बापूसाहेब देशमुख यांनी केले आहे.कार्यक्रमाअंती सर्व उपस्थितांचे गजानन देशमुख यांनी आभार मानले.

# महिलांना अनुदानावर मिळणार पिंक ई-रिक्षा; बहिणींनो आजच करा अर्ज

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १४ अमरावती**
महिला व बालविकास विभागातर्फे शहर आणि ग्रामीण भागातील गरजू महिलांना अनुदानावर पिंक ई-रिक्षा देण्यात येणार आहे. या योजनेत राज्य शासनाकडून २० टक्के अनुदान मिळणार आहे तसेच ६०० महिलांना रिक्षा खरेदीसाठी अर्थसाहाय्य करण्यात येणार आहे. यासाठी इच्छुक महिलांनी अर्ज करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

पिंक ई-रिक्षा योजनेतून महिला व मुलींच्या रोजगारनिर्मितीस चालना देणे, त्यांचे आर्थिक, सामाजिक पुनर्वसन करणे, स्वावलंबी, आत्मनिर्भर करणे, स्त्री सशक्तीकरणास चालना देणे, महिला व मुलींना सुरक्षित प्रवास करण्यासाठी नोकरी, तसेच रोजगाराच्या संधी उपलब्ध करण्यासाठी इच्छुक महिलांना रिक्षा खरेदी करण्यासाठी अर्थसाहाय्य व चालविण्यासाठी इतर सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. ई-रिक्षा उपलब्ध करणाऱ्या कंपनीच्या माध्यमातून महिलांना परवाना, परमिट, बॅच बिल्ला, प्रशिक्षण उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

**ई-रिक्षा किमतीच्या ७० टक्के कर्ज**



योजनेत ई-रिक्षाच्या किमतीमध्ये जीएसटी, रजिस्ट्रेशन, रोड टॅक्स आदी करांचा समावेश राहणार आहे. नागरी सहकारी बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, राष्ट्रीयीकृत बँका, अनुज्ञेय असलेल्या खासगी बँकांकडून ई-रिक्षा किमतीच्या ७० टक्के कर्ज उपलब्ध करून देण्यात येणार आहे. राज्य शासन २० टक्के आर्थिक भार उचलेल, योजनेची लाभार्थी महिला मुली यांना १० टक्के स्वहिस्सा भरावा लागणार आहे. कर्जाची परतफेड करण्यासाठी पाच वर्षे मुदत राहणार आहे.

**अर्जदाराचे वय २० ते ४० वर्षे**

लाभार्थीचे कुटुंब महाराष्ट्रातील रहिवासी असणे आवश्यक आहे. अर्जदाराचे वय २० ते ४० वर्षे असावे. योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्ज करणाऱ्या लाभार्थ्यांचे बँक खाते असणे आवश्यक आहे. लाभार्थी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ३ लाख रुपयांपेक्षा जास्त नसावे. विधवा, कायद्याने घटस्फोटित, राज्यगृहामधील इच्छुक प्रवेशित, अनाथ प्रमाणपत्रप्राप्त युवती, अनुरक्षणगृह बालगृहातील आजी-माजी प्रवेशितांना प्राधान्य देण्यात येणार आहे.

**योजनेचा लाभ एकदाच**

दारिद्र्यरेषेखालील महिलांनाही प्राधान्य देण्यात येणार आहे. योजनेचा लाभ एकदाच घेता येणार आहे, शासनाच्या इतर योजनांचा लाभ घेतलेला नसावा, महिला कर्ज घेण्यास पात्र असावी, परतफेडची जबाबदारी महिलेची राहणार आहे. योजनेसाठी महिलांनी अर्ज करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी सौरभ कटियार, महिला व बालविकास अधिकारी उमेश टेकाळे आणि जिल्हा समन्वय अधिकारी सुनील सोसे यांनी केले आहे.

# बंदूक वापरताय ? शस्त्र परवाना नूतनीकरण केले का?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १४ अमरावती**
जिल्ह्याच्या ग्रामीण भागात जिल्हाधिकारी कार्यालयाकडून शस्त्र परवाना दिला जातो. तो तीन वर्षांसाठी ग्राह्य असतो. तीन वर्षे पूर्ण होण्यापूर्वी त्या परवान्याचे नूतनीकरण करणे गरजेचे आहे. निवडणुका सुरळीतपणे पार पाडण्यासाठी निवडणूक कालावधीत जिल्ह्यातील शस्त्र परवानाधारकांकडील शस्त्रे जमा करण्याचे आदेश जिल्हाधिकारी देत असतात. पैकी ज्यांना सूट आहे, ते वगळून बहुतांश शस्त्रे त्या-त्या पोलिस ठाण्यात जमा करण्यात येतात.

जिल्ह्यात ज्या ३७५ जणांकडे शस्त्र परवाने आहेत. त्यात बिल्डर, लिडर, डॉक्टर व व्यापाऱ्यांचाही समावेश आहे. त्यांना स्वसंरक्षणार्थ व पीक संरक्षणार्थ ते देण्यात आले. त्या शस्त्र परवान्यांचे नूतनीकरण हे जिल्हाधिकारी कार्यालयातील गृह शाखेकडून केले जाते. शस्त्र परवान्यासाठी अर्ज आल्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयाकडून पोलिसांकडे रिपोर्ट मागविला जातो. पोलिसांकडून सविस्तर चौकशी करण्यात येते. अर्जदाराच्या जिवाला खरोखरच धोका आहे का, हेही तपासल्यानंतर परवाना देण्याची प्रक्रिया पूर्ण होते.

**नूतनीकरण न केल्यास दंड किती?**

शस्त्र परवाना नूतनीकरण न केल्यास संबंधित परवानाधारकाला दोन हजार रुपये दंड आकारला जातो, असे गृहशाखेकडून सांगण्यात आले.




> आमच्याकडे व्हेरिफिकेशन शस्त्र परवाने जिल्हाधिकारी कार्यालयाकडून दिले जातात. पोलिस व्हेरिफिकेशन करतात.
> **– सतीश पाटील, पोलिस निरीक्षक, विशेष शाखा**

**शुल्क किती?**

शस्त्र परवाना काढण्यासाठी, अर्जासाठी १५०० रुपये शुल्क आकारले जाते. त्याची चलान फाडावी लागते. शस्त्र परवाना देण्याची, रद्द करण्याची, नूतनीकरणाची संपूर्ण प्रक्रिया केली जाते.

**शस्त्र जमा करण्याचे कारण काय?**

निवडणूक कालावधीमध्ये शस्त्र अथवा हत्यारे, दारूगोळा यांचा गैरवापर होऊन कोणताही अनुचित प्रकार घडू नये, मानवी जीवितहानी किंवा सुरक्षिततेला व मालमत्तेला धोका पोहोचू नये. सार्वजनिक शांतता बिघडून दंगा होऊ नये, म्हणून.

**सर्वाधिक परवाने धारणी उपविभागात**

जिल्हाधिकारी कार्यालयातील गृह शाखेनुसार जिल्ह्यात एकूण ३७५ जणांकडे शस्त्र परवाने आहेत. त्यातील सर्वाधिक शस्त्र परवाने हे धारणी उपविभागात दिले गेले आहेत.

**तीन वर्षे संपण्यापूर्वी करा नूतनीकरण**

शस्त्र परवाना हा तीन वर्षांकरीता दिला जातो. ती कालावधी संपण्यापूर्वी नूतनीकरण करणे आवश्यक आहे. त्यासाठी अर्ज देखील द्यावा लागतो.

# अमरावती जिल्ह्यातील तरुणाचा पाकिस्तानमधील संघटनांशी संबंध सलग तिसऱ्या दिवशी चौकशी; एनआयए ची टीम तळ ठोकून

## आज पुन्हा चौकशीला बोलावले : मो. मुसैबचे वडील, मामाही हजर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १४ अमरावती**
शहरातील छायानगर परिसरातील रहिवासी मो. मुसैब शे. ईसा (२३) याला 'एनआयए'ने संशयाच्या आधारे १२ डिसेंबरला ताब्यात घेतले होते. १५ तासांच्या चौकशीअंती सायंकाळी सोडले होते. त्याचप्रमाणे शुक्रवारी सकाळी पुन्हा साडेनऊ वाजतापासून चौकशी सुरू करून रात्री साडेनऊ नंतर त्याला सोडून दिले. तसेच शनिवारी (दि.१४) सकाळी चौकशीसाठी बोलावले आहे. या तरुणाचा पाकिस्तानातील संघटनांशी संबंध असल्याचा एनआयए ला संशय आहे. त्यामुळे एनआयए चे पथक गेल्या तिन दिवसांपासून



अमरावतीमध्ये तळ ठोकून आहे.

शुक्रवारी सकाळी मो. मुसैबला त्याच्या वडिलांनी स्वतः राजापेठ ठाण्यात सायकल रिक्षात बसवून आणले व 'एनआयए'कडे चौकशीसाठी हजर केले. या वेळी मुसैबचे मामा सोबत होते. त्यानंतर 'एनआयए' ने मुसैबवर असलेल्या संशयाच्या आधारे सखोल चौकशी सत्र सुरू केले. शुक्रवारी रात्रीपर्यंत 'एनआयए' निश्चितच निष्कर्षाप्रत पोहोचणार, अशी चर्चा सुरू होती. परंतु शुक्रवारी रात्री साडेनऊ वाजेपर्यंत चौकशी करून त्याला सोडण्यात आले. मो. मुसैब हा एका दहशतवादी संघटनेसोबत जोडला गेला असावा किंवा त्यांच्यासोबत सोशल मीडिया ग्रुपवर तो सहभागी असावा, असा संशय 'एनआयए'ला आहे. त्याच संशयातून ही चौकशी सुरू आहे.

**अनेक महिने पैसे जमा करून घेतला मोबाइल**

मो. मुसैबची घरची परिस्थिती हलाखीची आहे. तो अत्तर विक्री करतो. त्यामधूनही त्याला फार पैसे मिळत नाही. दरम्यान त्याला स्मार्टफोन घ्यायचा होता, त्यासाठी त्याने अनेक महिने इतरांना थोडे, थोडेपैसे मागितले. अशा पद्धतीने जमा झालेल्या रकमेतून त्याने मोबाइल खरेदी केला असल्याचे मुसैबच्या मामाने सांगितले.

**गुरुवारी रात्री कोणासोबतच मोकळा बोलला नाही**

गुरुवारी सायंकाळी 'एनआयए' ने चौकशी करून मो. मुसैबला घरी सोडले. गुरुवारच्या रात्री तो घरीही कोणासोबतच चौकशीच्या विषयावर काहीच बोलला नाही. त्याच्या सोबत आम्ही बोलण्याचा प्रयत्न केला. मात्र तो बोलत नव्हता, असे मौ. मुसैबचे वडील शे. ईसा यांनी सांगितले आहे.

# काँग्रेस आमदार व विधानसभा निवडणुकीतील उमेदवारांशी प्रभारी रमेश चेन्नीथला चर्चा करणार

## मंगळवार १७ डिसेंबर रोजी नागपूर येथे आमदार व उमेदवारांची बैठक



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १४ मुंबई**
महाराष्ट्र काँग्रेस प्रभारी रमेश चेन्नीथल्ला १७ डिसेंबर २०२४ रोजी काँग्रेस पक्षाचे नवनिर्वाचित विधानसभा सदस्य, विधान परिषद सदस्य व २०२४ च्या विधानसभा निवडणुकीतील पक्षाचे सर्व उमेदवार यांच्याशी नागपूरमध्ये चर्चा करणार आहेत. नागपूर जिल्हा ग्रामीण काँग्रेस कमिटीच्या कार्यालयात ही चर्चा होणार असून सकाळी ११ वाजता आमदारांशी तर दुपारी १ वाजता विधानसभा निवडणुकीतील उमेदवारांशी स्वतंत्रपणे चर्चा करणार आहेत.

नागपूर येथे होत असलेल्या या महत्वपूर्ण चर्चेला संबंधित सर्वांनी उपस्थित रहावे असे निर्देश महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी दिल्याची माहिती महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष संघटन व प्रशासन नाना गावंडे यांनी दिली आहे.

# पी.आर.पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चरच्या विद्यार्थ्यांचा नागपुर येथे अभ्यास दौरा

## जगविख्यात चित्रकार राजा रविवर्मा यांच्या चित्र प्रदर्शनीला विद्यार्थ्यांची भेट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १४ अमरावती**
पी.आर. पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चरने बी-आर्च प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी एक दिवसीय शैक्षणिक दौऱ्याचे आयोजन नागपूर शहरात केले. या दौऱ्याचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना कला, वास्तुकला आणि डिझाईनच्या विविध पैलूंशी ओळख करून देणे, तसेच राजा रविवर्मा यांच्या कलेचे सखोल अध्ययन करणे होता.

दौऱ्याची सुरूवात गव्हर्नमेंट आर्ट अँड डिझाईन महाविद्यालय येथे आयोजित राजा रविवर्मा यांच्या ओलोग्राफ चित्रप्रदर्शनीला भेट देण्याने झाली. राजा रविवर्मा हे भारतीय चित्रकलेचे एक अत्यंत प्रतिष्ठित नाव आहेत, आणि त्यांनी देवी-देवतांना मूर्त रूप देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. या दौऱ्याच्या दरम्यान त्यांच्या चित्रकलेचे प्रभाव आणि त्यातील अद्वितीयता विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले. यावेळी गव्हर्नमेंट आर्ट अँड डिझाईन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वनाथ साबळे आणि प्रख्यात कला तज्ञ व चित्रकार डॉ. मनीषा पाटील यांचे मार्गदर्शन देखील विद्यार्थ्यांना लाभले. राजा रविवर्मा यांच्या कलेचा अभ्यास कोणत्याही कला आणि वास्तुकला विषयाशी संबंधित अभ्यासक्रमात अनिवार्य ठरतो, आणि याच अनुषंगाने पी.आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चरने हा दौरा आयोजित केला.



दुसऱ्या टप्प्यात, विद्यार्थ्यांनी वी.एन.आय.टी. नागपूर येथील वास्तुकला विभागात विशेष पी. आर. पाटील आर्किटेक्चर महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांकरिता आयोजित बेसिक डिझाईन या विषयावर प्राध्यापिका डॉ. सारिका बहादूरे यांचे मार्गदर्शन घेतले. डॉ. बहादूरे यांनी विद्यार्थ्यांना डिझाईनच्या तांत्रिक आणि कलात्मक बाबी समजावून सांगितल्या, ज्यामुळे विद्यार्थ्यांना डिझाईनच्या तात्त्विक आणि व्यावहारिक अंगांची माहिती मिळाली.

दौऱ्यादरम्यान, विद्यार्थ्यांनी नागपूरच्या एक महत्त्वपूर्ण वास्तू दीक्षाभूमीला देखील भेट दिली, जी वास्तुकलेच्या दृष्टिकोनातून एक उत्कृष्ट उदाहरण आहे. दीक्षाभूमीची वास्तुशास्त्रातील महत्त्वाची भूमिका विद्यार्थ्यांना कळली आणि त्या ठिकाणी वास्तुकलेशी संबंधित महत्त्वपूर्ण गोष्टी शिकायला मिळाल्या.

या शैक्षणिक दौऱ्याचे नियोजन प्राध्यापक डॉ .सचिन हजारे यांनी केले, आणि सहसंयोजक म्हणून प्राध्यापक भूपेंद्र जयस्वाल तसेच प्राध्यापिका तृप्ती भामकर यांचे महत्त्वाचे सहकार्य लाभले.

या दौऱ्याच्या यशस्वी आयोजनासाठी प्राचार्य संजय देशमुख यांनी आयोजक आणि विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

हा शैक्षणिक दौरा विद्यार्थ्यांसाठी एक अनमोल अनुभव ठरला, ज्यामुळे त्यांना कला, डिझाईन आणि वास्तुकलेच्या विविध पैलूंवर सखोल दृष्टिकोन मिळाला. या प्रकारच्या शैक्षणिक दौऱ्यांचे आयोजन विद्यार्थ्यांचे ज्ञान आणि प्रेरणा वाढविण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावते.